**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)**

**पृ.शी./मु.शी. :** तोंडी उत्तरे

**देवसरी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथे पैनगंगा नदीला आलेल्या पुरामुळे बाधीत झालेल्यांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(१) * ३८१८६ श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवसरी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथे सन २००६ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व पैनगंगा नदीला आलेल्या पुरामुळे गावातील दलित वस्तीमध्ये पाणी शिरुन मोठ्या प्रमाणात घरांची पडझड झाली होती उक्त बाब लक्षात घेता भविष्यात अतिवृष्टी झाल्यास पुरस्थिती निर्माण होऊन नागरिकांचे नुकसान होऊ नये यासाठी गावातील ९९ बाधीत दलित कुटुंबाचे मौजे आंबवन (ता.उमरखेड जि.यवतमाळ) येथील शासकीय सर्वे क्रमांक ६ ई वर्ग २ क्षेत्रफळ ५ अे ८१ आर जमिनीपैकी ३.०० हे.आर येथे सर्व सोयीसुविधांसह पुनर्वसन करण्यासाठी तत्कालिन जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केला असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या तक्त्यामध्ये "देवसरी गावाचे पुनर्वसन" असा उल्लेख केल्यामुळे शासनाच्या प्रचलित नियमानुसार व शासन निर्णयानुसार गावाच्या एकूण लोकसंख्येपैकी ७५ टक्के नसल्यामुळे सदर प्रस्ताव नामंजूर करीत असल्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महसूल व वन विभागाचा दिनांक २३ मार्च, १९८४ रोजीच्या शासन निर्णयातील अे(१) नुसार अंशतः पुनर्वसन व अशंतः पुनर्वसनाच्या सर्व सुविधा बाधित कुटुंबियांना शासनाकडून मिळणे बंधनकारक असूनही प्रत्यक्षात पुनर्वसन हे संपूर्ण गावाचे नसुन फक्त देवसरी गावातील दलित वस्तीतील बाधित ९९ कुटुंबाचे असल्याने सदरहू शासन निर्णय येथे लागू होत नाही याकडे लक्षवेधून व प्रस्तावात केलेल्या चुकीच्या उल्लेखाचा आधार घेत बाधित कुटुंबियाचे पुनर्वसन करण्यास

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ३८१८६.......

श्री.संतोष बांगर......

शासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, देवसरी गावातील दलित वस्ती ही ब्ल्यू झोननमध्ये असल्याने शासनाच्या धोरणानुसार कोणत्याही सोयी-सुविधा पुरविल्या जात नसुन याबाबत जिल्हाधिकारी यवतमाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतामळ, जिल्हा पुनर्वसन अधिकारी, यवतमाळ व उपविभागीय अधिकारी, उमरखेड यांच्याकडे वेळोवेळी पत्र व्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन देवसरी गावातील गत १५ वर्षापासून प्रलंबित असलेले ९९ पुरग्रस्त बाधित कुटुंबियांचे पुनर्वसन मौजे आंबवन (ता.उमरखेड जि.यवतमाळ) येथे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) सदर पूरग्रस्त गावात एकूण ५४८ कुटुंब संख्या असुन त्यापैकी पूरबाधित १८७ कुटुंबापैकी केवळ ९९ कुटुबांच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी सादर केला होता. शासन निर्णय दि.२३.०३.१९८४ मधील परिच्छेद (सी) (३) येथे नमुद अटीनुसार पूरबाधित गावातील किमान ७५% घरांचा समावेश निळया रेषेखालील पट्ट्यामध्ये होत असल्यास सदर गावाचे अन्य ठिकाणी पुनर्वसन करणे अभिप्रेत आहे. देवसरी गावातील ७५% घरे पूरबाधित नसल्याने उक्त शासन निणर्यातील परिच्छेद (सी) (३) येथील अटीची पुर्तता होत नाही. देवसरी गावातील ९९ पूरबाधित कुटुंबे उक्त शासन निर्णयातील नमुद अटीनुसार पुनर्वसनास पात्र ठरत नाही. त्यामुळे दि.०१.११.२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये सदर प्रस्ताव अमान्य करण्यात आलेला आहे.

(६) प्रश्नच उद्भवत नाही.

श्री.संतोष बांगर : अध्यक्ष महोदय, सदरहू पुनर्वसनाचा प्रश्न सन २००६ म्हणजेच सुमारे १५ वर्षापासून प्रलंबित आहे. शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या

ता.प्र.क्र. ३८१८६.......

श्री.संतोष बांगर......

तक्त्यामध्ये "देवसरी गावाचे पुनर्वसन" असा उल्लेख केल्यामुळे शासनाच्या प्रचलित नियमानुसार व शासन निर्णयानुसार गावाच्या एकूण लोकसंख्येपैकी ७५ टक्के बाधित नसल्यामुळे सदर प्रस्ताव नामंजूर करीत असल्याबाबत कळविण्यात आले आहे. परंतु प्रत्यक्षात पुनर्वसन हे संपूर्ण गावाचे नसून फक्त देवसरी गावातील दलित वस्तीतील बाधित ९९ कुटुंबाचे असल्याने सदरहू शासन निर्णय येथे लागू होत नाही याकडे लक्षवेधून प्रस्तावात केलेल्या चुकीच्या उल्लेखाचा आधार घेत बाधित कुटुंबियाचे पुनर्वसन करण्यास शासनाकडून जाणीवपूर्वक दिशाभूल केली जात आहे. महसूल व वन विभागाचा दिनांक २३ मार्च, १९८४ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासनाकडून पुनर्वसनाच्या सर्व सुविधा बाधित कुटुंबियांना मिळणे बंधनकारक असूनही प्रस्तावात केलेल्या चुकीच्या उल्लेखाचा आधार घेत बाधित कुटुंबियाचे पुनर्वसन करण्यास शासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन सदरहू कुटुंबावर अन्याय केला जात आहे.

अध्यक्ष महोदय, गावातील ९९ बाधित दलित वस्तीतील कुटुंबाचे मौजे आंबवन (ता.उमरखेड जि.यवतमाळ) येथील शासकीय सर्वे क्रमांक ६ ई वर्ग २ क्षेत्रफळ ५ अे ८१ आर जमिनीपैकी ३.०० हे.आर येथे सर्व सोयी-सुविधांसह पुनर्वसन करण्यासाठी तत्कालीन तहसीलदार यांनी दिनांक.......

**उपाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी नेमका प्रश्न विचारावा.

श्री.संतोष बांगर : महोदय, सदर पुनर्वसनाचा प्रश्न मागील १५ वर्षांपासून प्रलंबित आहे. याबाबत शासनाने अद्याप कोणताही योग्य निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे शासन आता तरी याबाबत योग्य निर्णय घेणार आहे काय?

श्री.विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, देवसरी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथे सन २००६ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व पैनगंगा नदीला आलेल्या पुरामुळे गावातील दलित वस्तीमध्ये पाणी शिरुन मोठ्या प्रमाणात घरांची पडझड झाली होती. सन २०११ च्या जनगणनेनुसार १८७ कुटुंबापैकी ९९ कुटुंब बाधित झाले होते. महसूल व वन विभागाच्या दिनांक २३ मार्च, १९८४ रोजीच्या शासन निर्णयानुसार गावातील ७५ टक्के घरे बाधित झाल्यानंतरच त्या गावातील बाधित घरांना पुनर्वसनाचा लाभ देता येतो. परंतु पार्शली देखील पुनर्वसनाचा लाभ देता येतो. सदर

गावातील दलित वस्तीतील ९९ कुटुंबाचे पुनर्वसन करण्याबाबतचा प्रस्ता

ता.प्र.क्र. ३८१८६.......

श्री.विजय वडेट्टीवार......

व दिनांक ०१ नोव्हेंबर, २०१८ रोजी शासनास प्राप्त झाला होता. परंतु तो प्रस्ताव परत करण्यात आला आहे. खरे पाहता तो प्रस्ताव परत न करता त्या प्रस्तावास मंजुरी देण्याची आवश्यकता होती. दिनांक २३ मार्च, १९८४ रोजीच्या शासन निर्णयानुसार गावातील ७५ टक्के घरे बाधित झाल्यानंतरच त्या गावातील बाधित घरांना पुनर्वसनाचा लाभ देता येतो. असे असले तरी पार्शली जेवढी घरे बाधित झालेली आहेत, तेवढ्याच घरांचे पुनर्वसन करणे अभिप्रेत होते.

यानंतर श्री.कुलकर्णी......

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ३८१८६...

श्री. विजय वडेट्टीवार...

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत मी सांगू इच्छितो की, एक महिन्याच्या आत ९९ घरांच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव मागवून घेण्यात येईल. ९९ घरांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता आहे. हे पुनर्वसन नियमामध्ये बसत आहे. सन २०१८ मध्ये सदर प्रस्ताव परत पाठविण्यात आलेला होता. तरीही मी सांगू इच्छितो की, हा प्रस्ताव मागवून घेण्यात येईल व एक महिन्यामध्ये प्रस्तावाला मान्यता देऊन ९९ घरांचे पुनर्वसन करण्यात येईल.

असुधारित प्रत

**कोळगाव (ता.करमाळा,जि.सोलापूर) येथील धरणावर बसविण्यात आलेले ट्रान्सफॉर्मर बंद असल्याबाबत**

**(२) * ३८२९३ श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळगाव - जेऊर उपविभाग (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील धरणावर बसविण्यात आलेले ३३/९९ के.व्ही.चे ट्रान्सफॉर्मर दिनांक ४ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास बंद असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ट्रान्सफॉर्मर बंद असल्यामुळे विजे अभावी त्या भागातील शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बंद असलेले ट्रान्सफॉर्मर त्वरीत सुरु करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी विनंती करुन सुध्दा ट्रान्सफॉर्मर दुरुस्त करण्यास तेथील अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसर ट्रान्सफॉर्मर दुरुस्त करण्यास जाणीवपुर्वक दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करुन नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्राजक्त तनपुरे, डॉ. नितीन राऊत यांच्याकरिता :** (१) हे खरे आहे.

कोळगांव-जेऊर उप विभाग (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील धरणालगत असलेल्या ३३/११ केव्ही कोळगांव उप केंद्राची स्थापित क्षमता ५ एमव्हीए आहे. माहे एप्रिल, २०१७ मध्ये उप केंद्रातील वाहिन्यांवरील भार वाढल्याने सोलापूर मंडल कार्यालय अंतर्गत उपलब्ध असलेला ३.१५ एमव्हीएचा पॉवर ट्रान्सफॉर्मर तेथील ५ एमव्हीएच्या पॉवर ट्रान्सफॉर्मरवरील भार कमी करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात बसविण्यात आला होता. माहे जून, २०१७ मध्ये तेथील वाहिन्यांवरील भार कमी झाल्यानंतर तात्पुरत्या स्वरूपात बसविण्यात आलेला ३.१५ एमव्हीएचा पॉवर ट्रान्सफॉर्मर बंद ठेवण्यात आला होता.

(२) हे खरे नाही.

३३/११ केव्ही कोळगांव उपकेंद्रातील ५ एमव्हीए पॉवर ट्रान्सफॉर्मर वरील तीन (३) वाहिन्यांद्वारे त्याभागातील शेतकऱ्यांना वीज पुरवठा करण्यात येत आहे.

ता.प्र.क्र. ३८२९३ .....
श्री. प्राजक्त तनपुरे....
(३) हे खरे नाही.

कोळगांव उपकेंद्रातील ३.१५ एमव्हीए पॉवर ट्रान्सफॉर्मर बऱ्याच कालावधी पासून वापरात नसल्याने मंडल कार्यालयाअंतर्गत सुस्थितीत असलेला ३ एमव्हीए पॉवर ट्रान्सफॉर्मर दिनांक ३१ जानेवारी, २०२२ रोजी कार्यान्वीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. प्रशांत बंब : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले की, दिनांक ४ ऑक्टोबर, २०१९ रोजी ट्रान्सफॉर्मर बंद झाला होता. हे खरे आहे, असे उत्तरात सांगण्यात आलेले आहे. ट्रान्सफॉर्मर बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे का, या प्रश्नावर 'हे खरे आहे' असे उत्तर देण्यात आले आहे. दिनांक ४ ऑक्टोबर, २०१९ रोजी हा ट्रान्सफॉर्मर बंद झाला होता. या प्रश्नाच्या उत्तरात असे नमूद आहे की, कोळगांव उप केंद्रातील ३.१५ एमव्हीचा ट्रान्सफॉर्मर दिनांक ३१ जानेवारी, २०२२ मध्ये लागल्यामुळे सुस्थितीत आला आहे. मी सांगू इच्छितो की, तेथे ३ महिने ट्रान्सफॉर्मर नव्हता. असे असेल तर तेथे नुकसान झाले नाही, हे मंत्री महोदयांनी कशाच्या आधारे सांगितले आहे ? कायद्यानुसार एखादा ट्रान्सफॉर्मर जळाला किंवा बंद पडला तर तो किती तासामध्ये लावणे बंधनकारक आहे ? तसेच तेथे ट्रान्सफॉर्मर विहित वेळेत लावला होता काय ? लावला नसेल तर शेतकऱ्यांना दर तासाला शेतकऱ्यांना दंड (भरपाई) द्यावा लागतो. असा दंड देण्यात आला आहे काय ? दिला नसेल तर तो देण्यात येणार आहे काय ?

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सदरहू ट्रान्सफॉर्मर हा डिस्ट्रयुब्युशनर ट्रान्सफॉर्मर असावा, अशी सन्माननीय सदस्यांची धारणा असावी. सध्या एका सब स्टेशनमधील पॉवर ट्रान्सफॉर्मरचा विषय सुरु आहे. धरणाच्या बॅक वॉटर जवळचा हा भाग आहे. सन २०१७ मध्ये लोड वाढल्यामुळे विजेची मागणी वाढली होती.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ३८२९३ .....
श्री. प्राजक्त तनपुरे....

त्यानुसार सब स्टेशनमध्ये अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आला होता. धरणातील पाणी कमी झाल्यामुळे किंवा पर्जन्यमान नसल्यामुळे कदाचित अतिरिक्त लोडची आवश्यकता नव्हती. त्यामुळे तो वापरण्यात आला नाही. परंतु गरज पडल्यानंतर ट्रान्सफॉर्मर सुरु करण्यात आला होता. हा सोपा विषय आहे. यामुळे कोठेही नुकसान झालेले नाही. माझ्याकडे धरणातील पाणी, पर्जन्यमान यांची आकडेवारी आहे. सन २०१६-१७ मध्ये ५.३१ टीएमसी पाणी होते. सन २०१७-१८, २०१८-१९,२०१९-२०,२०२०-२१ मध्ये पाणी नसल्यामुळे वापर नव्हता व तेथे ट्रान्सफॉर्मरची मागणी नव्हती. त्यामुळे तेथे कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही. दुसऱ्या मूळ ट्रान्सफॉर्मरवर विजेचा लोड देणे शक्य झाले होते. त्यामुळे तो ट्रान्सफॉर्मर चालविण्याची आवश्यकता भासली नाही. आता सन २०२१-२२ मध्ये धरणात पाणीसाठा उपलब्ध आहे. आता पुन्हा लोड वाढल्यामुळे ट्रान्सफॉर्मर चालू केला आहे.

श्री. प्रशांत बंब : अध्यक्ष महोदय, तिथे पिके नव्हती, शेतकऱ्यांना ट्रान्सफॉर्मरची आवश्यकता नव्हती म्हणून ट्रान्सफॉर्मर बंद केला व त्यामुळे नुकसान झाले नाही, असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. परंतु कोणताही ट्रान्सफॉर्मर बंद झाल्यानंतर किंवा जळाल्यानंतर किती तासाच्या आत तेथे नवीन ट्रान्सफॉर्मर लावला पाहिजे ? नवीन ट्रान्सफॉर्मर लावला नसेल तर नुकसान झाले असेल किंवा नसले तरीही शेतकऱ्यांना दर तासाला दंड (भरपाई) द्यावा लागतो. असा दंड देण्यात आला आहे काय ? नसल्यास तो देण्यात येणार आहे काय ?

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, तेथील ट्रान्सफॉर्मर बंद पडला नव्हता. तेथे आवश्यकता नसल्यामुळे तो जाणीवपूर्वक बंद केला गेला. त्यामुळे तेथे कोणतेही नुकसान झालेले नाही. त्यामुळे दंड देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

यानंतर श्री. चौधरी....

ता.प्र.क्र.३८२९३.....

श्री.राजेंद्र पाटणी : अध्यक्ष महोदय, ट्रान्सफॉर्मरच्या संदर्भातील हा अतिशय महत्त्वाचा विषय आहे. मागील १५ दिवस वाशिम जिल्हयामध्ये ट्रान्सफॉर्मरचे ऑईल उपलब्ध नसल्यामुळे १०० ट्रान्सफॉर्मर्स दुरुस्त होऊ शकले नाहीत. त्यासाठीचे ऑईल काल उपलब्ध करुन देण्यात आले आहे. केवळ ऑईल उपलब्ध नसल्यामुळे गहू व इतर पिकांना शेतकऱ्यांना पाणी देता आले नाही. विभागीय पातळीवर ऑईल उपलब्ध नसणे ही गंभीर बाब आहे. मी याबाबत मुख्य अभियंता यांच्याशी देखील चर्चा केली. त्यांनीही सांगितले की, "आमच्याकडे ऑईल उपलब्ध नाही." माझा प्रश्न असा आहे की, ऑईल नसल्यामुळे १५ दिवस १०० ट्रान्सफॉर्मर्स बंद होते ही बाब खरी आहे का ? जर खरी असेल तर हा मुद्दा अतिशय गंभीर आहे. ऑईलमुळे शेतकऱ्यांचे १०० ट्रान्सफॉर्मर्स १५ दिवस बदलले गेलेले नाहीत. मंत्री महोदयांनी याबाबत स्पष्टीकरण द्यावे. तसेच ही बाब खरी असेल तर अशी परिस्थिती भविष्यात उद्भवणार नाही याबाबत सरकार काळजी घेईल का ?

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, मूळ प्रश्न कोळगाव, जेऊर उपविभाग, ता.करमाळा, जि.सोलापूर येथील सब-स्टेशनमधील पॉवर ट्रान्सफॉर्मर संदर्भातील होता. तसेच पुढील चार-पाच प्रश्न ऊर्जा विभागाशीच निगडित आहेत. सन्माननीय सदस्यांचा प्रश्न मूळ प्रश्नाशी संबंधित नसला तरीही त्यांची भावना लक्षात घेऊन त्यासंदर्भातील अधिक माहिती सदस्यांना देण्यात येईल.

**औरंगपूर (ता.कारंजा, जि.वाशिम) येथे मुख्यमंत्री कृषीपंप योजनेंतर्गत बसविण्यात आलेले सौरपंप नादुरुस्त असल्याबाबत**

**(३) * ४०१६६ श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल)** : सन्माननीय ऊर्जा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगपूर (ता.कारंजा, जि.वाशिम) येथे मुख्यमंत्री कृषीपंप योजनेंतर्गत महावितरण कंपनीमार्फत शेतकऱ्यांना वितरीत केलेल्या स्पॅन कंपनीच्या सौर पंपामधून गत १ वर्षापासून पाण्याचा उपसा होत नसल्याबाबत शेतकऱ्यांनी संबंधितांकडे वेळोवेळी तक्रारी करूनही त्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले जात असून महिला शेतकरी श्रीमती सिंधूबाई भगत यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे आत्मदहनाची परवानगी मागितली असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शेतकऱ्यांना दुरुस्तीसाठी संबंधीतांकडे वारंवार तक्रारीकरुनही शासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे महिला शेतकऱ्यांनी आत्मदहनाचा शेवटचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत व दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्राजक्त तनपुरे, डॉ. नितिन राऊत यांच्याकरिता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) श्रीमती सिंधूबाई भगत यांनी त्यांच्या शेतात मे.स्पॅन पंप्स, पुणे या कंपनीद्वारे आस्थापित करण्यात आलेल्या सौर कृषीपंपकरीता निकृष्ट दर्जाचे साहित्य पुरविल्यामुळे स्प्रिंकलर नोझल पाणी उडवत नसून सौरपंप व्यवस्थित चालत नसल्याबाबत तीन वेळा तक्रार केली होती. सदर तक्रारींचे मे.स्पॅन पंप्स, पुणे या कंपनीद्वारे वेळोवेळी निराकारण करण्यात आले.

ता.प्र.क्र.४०१६६.....

**श्री.प्राजक्त तनपुरे, डॉ. नितिन राऊत यांच्याकरिता.....**

तद्नंतर श्रीमती भगत यांनी त्यांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष होत असल्याने दि.१४.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री यांचेकडे आत्मदहन करण्याची परवानगी मागितली. परंतु, मे.स्पॅन पंप्स, पुणे या कंपनीद्वारे दि.१७.०१.२०२२ रोजी श्रीमती भगत यांच्या सौर कृषीपंपाची पाहणी केली असता स्प्रिंकलरवर लावलेले पाईप हे व्यवस्थित न लावल्याने स्प्रिंकलर मध्ये पाणी येत नव्हते असे निदर्शनास आले, ते व्यवस्थित करुन देण्यात आले. त्यामुळे श्रीमती भगत यांनी त्यांच्या तक्रारीबाबत समाधान झाले असल्याचे व त्याबाबत त्यांची कुठलीही तक्रार राहिलेली नसल्याचे लेखी स्वरुपात कळविले आहे.

श्रीमती सिंधूबाई भगत यांच्या तक्रारींचे मे.स्पॅन पंप्स, पुणे या कंपनीद्वारे वेळोवेळी निराकारण करण्यात आले असल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.४०१६६.....

श्री मंगलप्रभात लोढा : अध्यक्ष महोदय, एक तरफ तो सरकार किसानों को बिजली देती नहीं है और दूसरी तरफ पात्र पंप के कनेक्शन काटती है. बिजली की कमी के कारण सौर ऊर्जा के पंप दिए जाएंगे ऐसा कहा जाता है. सौर ऊर्जा के पंप देने के बाद दो-दो साल तक सौर ऊर्जा के पंप चलते नहीं है. सात-सात बार शिकायत करने के बाद भी पंप के अंदर एक बूंद भी पानी नहीं आता है. एक आदिवासी महिला के द्वारा माननीय मुख्यमंत्री जी को आत्मदाह का पत्र लिखा गया. सौर ऊर्जा के पंप में पानी लाकर दीजिए या मुझे आत्महत्या की परवानगी दीजिए, ऐसा कहा गया है. लेकिन आत्महत्या की परवानगी नहीं मिली और सौर ऊर्जा पंप में पानी भी नहीं मिला. मेरा कहना यह है कि इस स्पॅन कंपनी को कितने पैसे दिए गए और ये पैसे वापिस पेनल्टी के साथ रिकव्हर करने के बारे में सरकार क्या करने वाली है? ये बड़ा घोटाला है. जिन अधिकारियों ने ये घोटाला किया, सौर ऊर्जा पंप के नाम पर फ्रॉड करके सरकार के पैसे डूबाकर किसानों को उल्लू बनाने का तरीका जिन अधिकारियों का है, उन अधिकारियों के खिलाफ सरकार क्या कार्रवाई करने वाली है? इसका जवाब माननीय मंत्री महोदय ने देना चाहिए.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, प्रश्नामध्ये उल्लेख केलेल्या महिला शेतकरी श्रीमती सिंधुबाई भगत यांनी वारंवार यासंदर्भात तक्रारी केलेल्या आहेत. या विषयाच्या खोलात जाऊन पाहिले तर दिसून येते की, कंपनीने तेथे जाऊन पाहणी करुन तक्रार निवारण करण्याचा... (अडथळा...)

अध्यक्ष महोदय, श्रीमती सिंधुबाई भगत यांच्या चार वेळा तक्रारी आल्या. चारही वेळा कंपनीच्या प्रतिनिधींनी जाऊन तक्रारीचे निराकरण केलेले आहे. सोलर पॅनेल, डी.सी. पम्प आणि मोटार बसविण्याचे काम कंपनीमार्फत केले जाते. त्याव्यतिरिक्त असलेल्या बाबी जसे की, पाईप, स्प्रिंकलर या गोष्टी कंपनीच्या अखत्यारित येत नाहीत. परंतु दुर्दैवाने सर्व तक्रारी त्याच संदर्भातील होत्या. उदाहरण द्यायचे झाले तर "पी.व्ही. पॅनेलवर धूळ बसली होती. पॅनेल वॉश करण्यात आले." खरे तर, या सर्व मार्गदर्शक सूचना आपण त्यांना पम्प बसवितानाच सांगत असतो.

ता.प्र.क्र.४०१६६.....

श्री.प्राजक्त तनपुरे.....

दिनांक २४.०८.२०२१ रोजी आलेल्या तक्रारीचे निराकरण केल्याची माहिती अशी आहे की, "पॅनेलवरील धूळ वॉश करण्यात आली. त्यानंतर पम्प सुरु झाला होता." त्यानंतरची तक्रार अशी होती की, "होस पाईपचे निपल गंजमुळे खराब झाले." परंतु ही बाब कंपनीच्या अखत्यारित येत नाही.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.४०१६६...

श्री. प्राजक्त तनपुरे...

त्यामुळे कंपनीच्या बाबतीत सोलर पॅनेल, डी.सी.पंप यासंबंधी तक्रार नव्हती. जी तक्रार होती त्या तक्रारीचे निराकरण केलेले आहे. जरी ती स्कोपमध्ये नसली तरी निराकरण केले आहे. येथून पुढे आपल्या शेतकऱ्यांनी त्याची देखभाल कशी करावी याचे मार्गदर्शन कंपनी करीत आहे. तरी देखील आपण यासंबंधी आपण मार्गदर्शक सूचना सर्व शेतकऱ्यांसाठी वितरित करण्याची व्यवस्था करु.

श्री मंगलप्रभात लोढा : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री महोदय का कहना है कि सरकार की जिम्मेदारी केवल पंप बिठाने की है. सौर ऊर्जा पंप खराब हो गया तो सरकार की जिम्मेदारी नहीं है. यदि आगे वॉटर सिस्टिम नहीं चल रही है, यह बात सरकार की समझ में नहीं आती है तो किसान को कैसे समझ में आएगा कि आगे का सौर ऊर्जा पंप कैसे क्लीन करना चाहिए, पंप के आगे का प्रेशर कैसे इस्तेमाल करना चाहिए? अध्यक्ष महोदय, यह बहुत ही सरल सवाल था कि जो पंप बिठाया जाता है उसका पानी बाहर निकलने का प्रोसेस तो सरकार करेगी ना? जिसको सप्लाय करने का कॉन्ट्रैक्ट दिया गया है, उसको सरकार ने कितने पैसे दिए है? टेंडर का प्रोसेस क्या था? मंत्री महोदय से मेरा निवेदन है कि इस बारे में एक समिति का गठन किया जाए और इसकी सारी जांच करके इसकी रिपोर्ट विधानसभा में पेश की जाए.

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, जेव्हा आपण सोलर पंप बसवितो तेव्हा त्या यंत्रणेचे काम ते पॅनेल बसविणे, डी.सी. बसविणे आणि पाणी ठराविक उंचीपर्यंत आणून देणे इतके आहे. परंतु सन्माननीय सदस्य सांगतात तो कंपनीच्या स्कोपच्या बाहेरचा आहे. तरी देखील आपण सर्व संबंधित शेतकऱ्यांना याचे पुरेसे ज्ञान मिळण्यासाठी आणि त्यांना मार्गदर्शन होण्यासाठी मेळावे घेऊ आणि यासंबंधी सर्व शेतकऱ्यांपर्यंत मार्गदर्शन सूचनांची एक पुस्तिका वितरित करु.

ता.प्र.क्र.४०१६६...

श्री. नाना पटोले : अध्यक्ष महोदय, सौर ऊर्जा पंप बसविण्यासंबंधी मागील सरकारने निर्णय केला होता. पण मागील ५ वर्षात शेतकऱ्यांना कनेक्शन्स मिळालेलेच नाहीत. आपण राज्यात सौज ऊर्जा पंप बसविण्याचे धोरण स्वीकारले आहे. शेती सौर ऊर्जेची कनेक्शन्स अलिकडच्या काळात देणे सुरू झाले आहे. पण अनेक ठिकाणी असे लक्षात आले की, एकदा पंप बसविल्यानंतर त्या कंपनीचे इंजिनिअर्स तेथे जात नाहीत आणि त्या ठिकाणी अनेक दिवस सौर ऊर्जेचे कन्शेक्शन्स जोडले जात नाही. म्हणून यासंबंधी विधिमंडळाची एक समिती गठीत करावी, अशी मघाशी सन्माननीय सदस्य श्री. मंगलप्रभात लोढा यांनी विनंती केली आहे.

शेतकऱ्यांना त्रास देणारी एक व्यवस्था निर्माण झाली आहे. मी भ्रष्टाचार शब्द वापरणार नाही. पण शेतकऱ्यांना त्रास देणारी ही व्यवस्था आहे. संपूर्ण महाराष्ट्रात ही स्थिती आहे. खरं म्हणजे पण या ठिकाणी मंत्री महोदय कंपनीची जाहिरात करीत आहेत, असे मला वाटते. वास्तविक शेतकऱ्यांना सौर ऊर्जेच्या बाबतीत जो त्रास दिला जात आहे तो कसा संपविला जाईल, हे सांगितले पाहिजे. हा एकाच प्रश्न नाही तर महाराष्ट्रातील सर्व सौर ऊर्जेच्या पंपाबाबत हा प्रश्न आहे. त्यामुळे या प्रश्नाला विस्तृत उत्तर आणि पुढील काळात शेतकऱ्यांना सौर ऊर्जेच्या पंपासंबंधी त्रास होणार नाही, याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे, हा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे.

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भावना अत्यंत मोकळेपणाने या ठिकाणी व्यक्त केल्या आहेत. सौर ऊर्जा पंप शेतकऱ्यांना निश्चितपणे कशा पध्दतीने वापरता येईल, यासाठी आपण एक पुस्तिका वितरित करणार आहोत. परंतु आता "कुसूम" ही योजना येऊ घातली आहे. त्यामध्ये राज्य सरकारचा फार मोठा वाटा आहे. त्यामुळे पंप बसविल्यानंतर तो व्यवस्था चालू राहिल. त्याची देखभाल व दुरुस्ती शेतकऱ्यांनी कशी करावी हे सखोल ज्ञान शेतकऱ्यांना दिले जाईल. त्यांची फसवणूक होणार नाही किंवा अडवणूक होणार

ता.प्र.क्र.४०१६६...

श्री. प्राजक्त तनपुरे...

नाही, याकरिता या "कुसूम" योजनेच्या अंमलबजावणी एक स्वतंत्र यंत्रणा आम्ही शेतकऱ्यांना मार्गदर्शन देण्यासाठी सुरू करु.

**उपाध्यक्ष :** मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सर्वांनी आपापले मास्क लावावेत.

यानंतर श्रीमती कोळगिरे...

असुधारित प्रत

**गडचिरोली जिल्ह्यात डीमांड भरलेल्या शेतकऱ्यांच्या**

**कृषीपंपांना वीज जोडणी देण्याबाबत**

(४) * **४००१५ श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), डॉ.देवराव होळी (गडचिरोली)** : सन्माननीय ऊर्जा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देसाईगंज, आरमोरी, व कुरखेडा (जि.गडचिरोली) या तालुक्यासह संपुर्ण गडचिरोली जिल्हयातील सुमारे ३ हजार शेतकऱ्यांनी सन २०१८-१९ पासुन कृषीपंप वीज जोडणीसाठी महावितरणकडे अर्ज सादर करुन पैसेही भरलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३ वर्षाचा कालावधी होऊनही अद्यापपर्यंत ३ हजार शेतकऱ्यांपैकी केवळ १२७६ शेतकऱ्यांना चीज जोडणी देण्यात आली असुन अद्यापही १७२४ शेतकरी कृषीपंप वीज जोडणी पासुन वंचित असल्याची गंभीर बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना कृषीपंप जोडणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. प्राजक्त तनपुरे, डॉ. नितिन राऊत यांच्याकरिता : (१) हे अंशत: खरे आहे.

गडचिरोली जिल्हयामध्ये सन २०१८-१९ पासून ते माहे जानेवारी, २०२२ पर्यंत ४,१३८ कृषीपंप ग्राहकांचे अर्ज कृषीपंपाच्या वीज जोडणीकरीता प्राप्त झाले होते.

(२) व (३) हे खरे नाही.

गडचिरोली जिल्हयामध्ये सन २०१८-१९ पासून माहे जानेवारी २०२२ पर्यंत कृषीपंप वीज जोडणीसाठी पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ४,१३८ कृषीपंप अर्जदारापैकी १,३७४ अर्जदारांना वीज जोडण्या देण्यात आल्या असून, उर्वरित २,७६४ अर्जदारांना कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत वीज जोडणी

ता.प्र.क्र. ४००१५**.....**

श्री. प्राजक्त तनपुरे....

अनुज्ञेयतेनुसार २५०० अर्जदारांना उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे तर २६४ अर्जदारांना सौर कृषी पंपाव्दारे वीज जोडण्या देण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४००१५.....

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, गडचिरोली जिल्ह्यामध्ये सन २०१८-१९ पासून माहे जानेवारी २०२२ पर्यंत कृषीपंप वीज जोडणीसाठी पैसे भरुन प्रलंबित असलेल्या ४,१३८ कृषीपंप अर्जदारापैकी १,३७४ अर्जदारांना वीज जोडण्या देण्यात आल्या असून, उर्वरित २,७६४ अर्जदारांना कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत वीज जोडणी अनुज्ञेयतेनुसार २,५०० अर्जदारांना उच्चदाब वितरणे प्रणालीद्वारे तर २६४ अर्जदारांना सौर कृषी पंपाद्वारे वीज जोडण्या देण्याचे नियोजित आहे,अशा प्रकारचे उत्तर प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये दिलेले आहे.

अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने या प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे. कृषी धोरण-२०२० नुसार पुढच्या जोडण्या देण्यात येणार आहेत. कनेक्शन देणे बाकी असल्याचा विषय सन्माननीय सदस्यांनी सांगितला आहे. गडचिरोली जिल्ह्यामध्ये सन २०१८-१९ पासून म्हणजे एचव्हीडीएसचे उद्दिष्ट फ्रिझ झाले त्याच्यानंतर जानेवारी, २०२२ पर्यंत कृषीपंप वीज जोडणीसाठी पैसे भरून प्रलंबित असलेल्या ४,१३८ ग्राहकांपैकी १,३७४ अर्जदारांना कृषीपंप वीज जोडणी देण्यात आहे. त्यापैकी कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत १,२२८ जिल्हा नियोजन समिती व इतर योजनेंतर्गत १४६ कृषीपंपांना वीज जोडण्या देण्यात आलेल्या आहेत. उरलेल्या २,७६४ वीज जोडण्या प्रलंबित आहेत. त्यामध्ये Agriculture Contingeny Fund (ACF ) हा गाव पातळीवरील निधी आहे. याच्या माध्यमातून आपण वीज जोडणीसाठी पैसे उपलब्ध करुन देऊ शकतो. सन २०२० च्या नवीन कृषी धोरणानुसार आपण ही तरतूद केलेली आहे. याच्या पूर्वी दिनांक ३१ मार्च,२०१८ पासून जानेवारी २०२१ पर्यंत आपण या शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारे कनेक्शन देऊ शकत नव्हतो. कृषी धोरण-२०२० नुसार आपण पुन्हा २०० मीटरपर्यंत एलटी लाईनवर कनेक्शन सुरु केले आहेत. झिरो पोलचे कनेक्शन असतील तर आपण ते तातडीने लावून देतो आणि ज्याला पोलची रिक्वायरमेंट असेल त्यासाठी एसीएफ मधून पैसे खर्च करण्याचे आपण नियोजन केलेले आहे. त्या व्यतिरिक्त जिल्हा नियोजन समितीमधून देखील पैसे उपलब्ध होऊ

ता.प्र.क्र. ४००१५**.....**

श्री. प्राजक्त तनपुरे....

शकतात. या माध्यमातून गडचिरोली जिल्ह्यात गाव पातळीवर एसीएफ म्हणजे गावातच ३३ टक्के पैसे खर्च करायचे आहेत. तो निधी साधारणपणे ८ कोटी रुपये आहे. त्या माध्यमातून ज्या ज्या गावात हे पैसे उपलब्ध असतील तिथे अत्यंत प्राधान्याने वीज जोडणी कनेक्शन देण्यात येईल.

श्री. कृष्णा गजबे : अध्यक्ष महोदय, जानेवारी, २०२२ मध्ये माननीय मंत्री गडचिरोली जिल्ह्यामध्ये आले होते. सन २०१८-१९ ते जानेवारी, २०२२ पर्यंत ४,१३८ लाभार्थ्यांनी फॉर्म आणि पैसे भरलेले आहेत. आज तीन वर्ष होऊन गेले आहेत तरी फक्त १,३७४ लोकांना कृषीपंपाचे कनेक्शन दिलेले आहे. परंतु उर्वरित २,७६४ हे कृषी लाभार्थी आहेत. त्यांना मागच्या ३ वर्षापासून कनेक्शन मिळालेले नाही. एसीएफच्या माध्यमातून ते काम करायचे आहे हे माननीय मंत्र्यांनी सांगितले. मागच्या आठ दिवसापासूनच नाही तर प्रत्येक महिन्यात मी ऊर्जा विभागाच्या अधिकाऱ्यांना फोनद्वारे तसेच स्वत: तिथे जाऊन बोलतो. एसीएफच्या माध्यमातून कोणत्या ग्रामपंचायत मध्ये किती पैसे आहेत आणि ते किती महत्त्वाचे आहेत याची मी त्यांना आठवण करुन देतो. याबाबत मी त्यांना पत्र व्यवहार ही केला आहे. पण अजूनही वडसा, आरमोरी आणि कुरखेडा या तालुक्यातील तसेच पूर्ण जिल्ह्यातील ही समस्या आहे. परंतु ऊर्जा विभागाने अजूनही एसीएफ निधी उपयोगात आणलेला नाही.

यानंतर श्रीमती करंदीकर....

ता.प्र.क्र. ४००१५.....

श्री. कृष्णा गजबे....

असे सांगितले जाते की, या फंडचे नियोजन झाल्यावर माननीय पालक मंत्री यांची सही पाहिजे. माननीय पालक मंत्री ज्यावेळी मंजुरी देतील तेव्हा काम करता येईल. हे पत्र मी व्हॉट्स ॲपवर मागविले आहे. ते मी पालक मंत्री महोदयांना दाखवणार आहे. अशा प्रकारे सर्व भोंगळ कारभार सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, गडचिरोली जिल्हा हा अतिदुर्गम भाग आहे. त्या ठिकाणी इतर कोणताही मोठा उद्योग नाही. येथील मूळ व्यवसाय शेती आहे. शेतकऱ्यांचे प्रमुख पीक धान आहे. शासनाने नवीन धोरण केले आहे की, कृषी पंपांना ८ तास वीज द्यावी. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले उपस्थित आहेत. चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया येथे धान उत्पादन हे प्रमुख पीक आहे. शेतीच्या उत्पादनातून शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह चालतो. असे असताना शेतकऱ्यांना कनेक्शन योग्य प्रकारे मिळत नाहीत. २ हजार ७६४ कनेक्शन्स किती दिवसात मिळणार आहेत ? तसेच शेतकऱ्यांना ८ तास ऐवजी २४ तास वीज पुरवठा केला जावा. गडचिरोली जिल्हा हा आदिवासी बहुल आहे. या संबंधी मंत्री महोदयांनी सविस्तर उत्तर द्यावे, अशी मी विनंती करतो.

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भावना मी समजू शकतो. ३ वर्षांपासून कनेक्शन दिलेले नाही, असे त्यांनी सांगितले. नवीन धोरण येण्यापूर्वी आपले सन २०१८ मध्ये जुने धोरण होते. एचव्हीडीएसच्या माध्यमातून वीज कनेक्शन देण्याचे धोरण होते. यामुळे इच्छा असून देखील एल.टी लाईनवर कनेक्शन देता येत नव्हते. ज्या लोकांनी दि. ३१ मार्च, २०१८ पूर्वी ऑनलाईन अर्ज केलेले असतील त्यांना एचव्हीडीएसच्या माध्यमातून कनेक्शन देण्याची तरतूद सन २०१८ च्या धोरणामध्ये होती. १ लाख २९ हजार नवीन पंपांना एचव्हीडीएसच्या माध्यमातून कनेक्शन देण्यात आले. राज्यातील शेतकऱ्यांना मागील धोरणानुसार

ता.प्र.क्र. ४००१५.....

श्री. प्राजक्त तनपुरे .....

कनेक्शन देता येत नाही. यामुळे शेतकऱ्यांना न्याय देता येत नाही. ही अडचण लक्षात घेऊन कृषी धोरण, २०२० आणले. या दोघांची तुलना केली तर असे दिसून येते की, राज्यामध्ये सन २०१८ पासून एचव्हीडीएसच्या माध्यमातून १ लाख २९ हजार कनेक्शन्स दिलेले आहेत. नवीन धोरण आल्यानंतर एका वर्षात १ लाख ३४ हजार कनेक्शन्स दिले आहे. सौर ऊर्जेचे वेगळे कनेक्शन्स आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, त्यांना अधिकारी असे सांगतात की, पालक मंत्री यांची सही लागते. वस्तुत: पालक मंत्री यांची सही व मंजुरी जिल्हा पातळीवरील एसीएफ मधून मोठे सबस्टेशन करण्यासाठी लागते. गाव पातळीवरील ३३ टक्के एसीएफ साठी पालक मंत्री महोदयांची सही लागत नाही. त्यासाठी माननीय आमदारांनी सांगितले तरी काम होऊ शकते. आपण सांगितल्यानंतर देखील जर अधिकाऱ्यांनी हयगय केली असेल तर या बाबत मी सविस्तर माहिती मागवून घेतो. एखाद्या गावामध्ये जर एसीएफ उपलब्ध असेल तर सन्माननीय सदस्यांनी तेथील कार्यकारी अभियंता यांना सांगावयाचे. त्यांनी त्या नुसार कार्यवाही करायची असते. मी या बाबत माहिती मागवून घेतो. जर सन्माननीय सदस्यांनी सांगून देखील अधिकाऱ्यांनी हलगर्जीपणा केला असेल तर या बाबत माहिती मागवून उचित कारवाई केली जाईल.

डॉ. देवराव होळी : अध्यक्ष महोदय, या ठिकाणी मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे ते ५० टक्के योग्य व ५० टक्के चुकीचे आहे. गडचिरोली जिल्ह्यामध्ये निधीची कमतरता अजिबात नाही. माझा प्रश्न आहे की, सन २०१८-१९ मध्ये एकूण प्रलंबित वीज जोडण्या २२९ होत्या. त्याचे टेंडर झाले होते काय किंवा नाही ? सन २०१९-२०२० मध्ये मध्ये एकूण प्रलंबित वीज जोडण्या २६३ आहेत. त्याचे टेंडर झाले होते किंवा नाही ? सन २०२०-२१ मध्ये ११०१ वीज जोडण्या प्रलंबित आहेत त्याचे देखील टेंडर झाले होते काय ? सन २०२१-२२ पर्यंत १०७१ वीज जोडण्या प्रलंबित आहेत. त्याची पूर्ण टेंडर प्रोसेस झाली होती किंवा नाही ?

यानंतर श्रीमती गिरप.....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ४००१५ ...

डॉ.देवराव होळी .....

झाली असेल तर संबंधित ठेकेदाराने ते काम केले किंवा नाही किंवा त्या ठिकाणी ३३:३३:३४ चे जे नॉर्म्स, जी टेंडर प्रक्रिया आहे तिची अंमलबजावणी होत नाही. टेंडर प्रक्रिया झाल्यानंतरही तुमचे एक्झेक्युटिव्ह इंजिनिअर असतील, एस.ई. असतील किंवा संबंधित डेप्युटी इंजिनिअर आहेत ते लोक त्या पध्दतीने काम करीत नाहीत.

अध्यक्ष महोदय, गडचिरोली जिल्ह्याला कोणत्याही पध्दतीने निधीची कमतरता नाही. परंतु, महाविकास आघाडी सरकार ज्या पध्दतीने शेतकऱ्यांवर अन्याय करीत आहे त्यामुळे त्या शेतकऱ्यांची वीज जोडणी प्रलंबित आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. गडचिरोली जिल्हा हा अतिशय मागासलेला आहे. तसेच नक्षलग्रस्त आहे. तेथील शेतकरी हा संपूर्ण धानावर आधारित शेती करीत आहे. माझी नम्र विनंती आहे की, या संपूर्ण प्रकरणाची आपण चौकशी करणार आहात काय?

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, सन २०१८-२०१९ एवढे प्रकल्प प्रलंबित आहेत, सन २०१९-२०२० मध्ये एवढे प्रकल्प प्रलंबित आहेत. टेंडर झाले का, असे त्यांनी विचारले आहे. मी मघाशी दिलेल्या उत्तरामध्ये देखील सांगितले की, एचव्हीडीएस योजनेचे टेंडर हे सन २०१८ च्या दरम्यान झालेले आहे. त्याचीच अंमलबजावणी जवळपास आजपर्यंत देखील सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर कृषी वीज धोरण, २०२० जाहीर केले गेले. त्या अनुषंगाने या एसीएफ मधून आता वीज जोडण्या देण्याचे काम सुरु केलेले आहे. त्याची प्रक्रिया देखील मी मघाशी सांगितली की, आमदारांनी ... एक्झेक्युटिव्ह इंजिनिअरच्या हातामध्ये... तो एस.ई. पर्यंत देखील जात नाही. एक्झेक्युटिव्ह इंजिनिअर तो करतात. जी काही एमपॅनेलमेंट एजन्सी असेल त्यांना ती कामे करावी लागतात.

ता.प्र.क्र. ४००१५ ...

श्री.प्राजक्त तनपुरे ...

अध्यक्ष महोदय, मी मघाशी देखील सांगितले की, यामध्ये आमदार महोदयांनी सांगून देखील जर कुठल्या अधिकाऱ्यांनी कारवाई ... ते अपेक्षित पुढे गेले नसतील तर माहिती मागवून निश्चितपणे कारवाई करता येईल. महाविकास आघाडीचा आपण उल्लेख केला. मी पुन्हा एकदा ही आकडेवारी आपल्या समोर सांगू इच्छितो की, मागच्या धोरणानुसार सन २०१८ पासून आतापर्यंत ४ वर्षांमध्ये १ लाख २९ हजार कनेक्शन्स दिली गेलेली आहेत. शासनाने आणलेल्या नवीन धोरणामध्ये फक्त एकाच वर्षात त्यापेक्षा जास्त कनेक्शन्स देण्यात आली आहेत.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : अध्यक्ष महोदय, यावर जास्त चर्चा न करता मंत्री महोदयांनी गडचिरोली जिल्ह्यात यावे व जी प्रकरणे आहेत ती सर्व निकाली लावण्याच्या दृष्टिकोनातून कारवाई करावी, अशी मी विनंती करतो.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, मी मागे एकदा गडचिरोली जिल्ह्याचा दौरा केला होता. सन्माननीय सदस्यांच्या विनंतीनुसार पुन्हा एकदा एखादी बैठक लावून सर्व सन्माननीय सदस्यांना निमंत्रित करुन या वीज जोडणीच्या कार्यक्रमामध्ये कुठे काही त्रुटी असतील तर सर्वांना बरोबर घेऊन त्याची योग्य अंमलबजावणी केली जाईल.

ॲड.आशिष जैस्वाल : अध्यक्ष महोदय, ...

**उपाध्यक्ष** : मंत्री महोदय जर तेथे येऊन त्याची ... (अडथळा) ... मंत्री महोदय आपण ठरल्याप्रमाणे त्या ठिकाणी जाऊन बैठक घ्यावी. आता आपण तारांकित प्रश्न क्रमांक ५ चर्चेकरिता घेऊ या.

ॲड.आशिष जैस्वाल : अध्यक्ष महोदय, माझा या विषयाशी, आदिवासींशी संबंधित असा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. आपण पीठासीन अधिकारी म्हणून त्या आसनावर बैठल्यानंतर या विषयाला न्याय मिळाला पाहिजे. महाराष्ट्रातील दुर्गम आदिवासी भागात सिंचनाची कोणतीही व्यवस्था नाही. कारण ते जंगलात राहतात.

ता.प्र.क्र. ४००१५ ...

ॲड.आशिष जैस्वाल...
तेथे वन कायद्यामुळे कॅनॉल करता येत नाही. ज्या विहिरी आहेत ... विदर्भातील पूर्ण ११ जिल्ह्यामध्ये जेवढी शेती पंपांची कनेक्शन्स आहेत, तेवढी एकट्या पुण्यामध्ये आहेत. तेवढी एकट्या नगरमध्ये आहेत ... (अडथळा)...

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य आपण प्रश्न विचारावा.

ॲड.आशिष जैस्वाल : अध्यक्ष महोदय, माझा असा प्रश्न आहे की, आदिवासी शेतकऱ्यांना कनेक्शन देताना त्यांना असे सांगितले जाते की, तुला जास्त पोल लागतात, तुला कनेक्शन देत नाही. तुम्ही सोलर घ्या. आदिवासी शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी, त्यांच्या विहिरींना कनेक्शन देण्यासाठी कोणतीही अट न लावता शासन स्वनिधीने कनेक्शन लावून देईल किंवा आदिवासी विकास विभागाशी संपर्क करुन त्यांच्याकडून निधी घेऊन ...., असा धोरणात्मक निर्णय मंत्री महोदयांनी जाहीर करावा.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांचा कदाचित काही गैरसमज होत असेल. आपण यामध्ये जो मागेल त्याला कनेक्शन देत आहोत. आदिवासी विकास योजनेतील टीएसपी एरिया आहे.... (अडथळा)... त्यातून पैशाची देखील अधिक तरतूद या कनेक्शनसाठी होऊ शकते. या व्यतिरिक्त गडचिरोली जिल्ह्यामध्ये जो काही आदिवासींचा निधी आहे तो देखील यामध्ये वापरला जाऊन त्यामध्ये देखील उपयोग केला जाऊ शकतो.

ॲड.आशिष जैस्वाल : अध्यक्ष महोदय, .... (अडथळा)... म्हणून त्याला कनेक्शन दिले जात नाही ... (अडथळा)...

**उपाध्यक्ष** : डीपीडीसीला आदिवासी विकास विभागाचे फंड्स मिळतात. मी सुध्दा ट्रायबल एरियामध्येच काम करतो. .... (अडथळा)... आदिवासी विकास विभागाचे फंड्स विशेष बाब म्हणून डीपीडीसीला मिळतात.

.............

यानंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

**नवापूर (जि.नंदुरबार) येथे १३२ के.व्ही. अति उच्च दाब उपकेंद्रास मंजुरी देऊन कार्यान्वित करण्याबाबत**

**(५) * ४०१९४४ श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवापूर (जि.नंदुरबार) येथील विसरवाडी परिसरात १३२ के.व्ही. अति उच्च दाब उप केंद्रामधून वीज पुरवठा होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त १३२ के.व्ही. अति उच्च दाब उप केंद्रावर अगोदरच विदयुत पुरवठ्याचा भार जास्त असून नवापूर येथील औद्योगिक वसाहतीमधील औद्योगिक कारखाने, विदयुत पंपासाठीचा विजेचा वापर व घरगुती विजेचा वापर यासाठी देखील विदयुत भार जास्त लागत असल्याने नवापूर परिसरात वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्याने वीज ग्राहकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवापूर परिसरात वीज पुरवठा अखंडीत योग्य दाबाने सुरु करण्यासाठी नवापूर येथे १३२ के.व्ही. अति उच्च दाब केंद्र कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?.

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) नवापूर तालुक्यातील वीज ग्राहकांना अधिक दर्जेदार, अखंडीत, योग्य दाबाने व खात्रीशीर वीज पुरवठा करण्याच्या दृष्टीने व वीजेची भविष्यातील वाढती मागणी लक्षात घेता नवापूर येथे नवीन १३२ के.व्ही. अति उच्च दाब उप केंद्र उभारणीचा प्रस्ताव महावितरण कंपनीकडून महापारेषण कंपनीस अग्रेषित झाला आहे. त्यानुषंगाने, महापारेषण कंपनीकडून प्रणाली अभ्यासाव्दारे उपकेंद्राची सुसाध्यता तपासून नियमानुसार योग्य निर्णय घेण्यात येत आहे.

(उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

-----------------

अप्रकाशित प्रत

**मौ.अंजनवाडी, मौ.कामठा व मौ.पिंपरी (ता.औंढा-नागनाथ, जि.हिंगोली) या पुनर्वसित गावांना मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(६) * ३९९३९ श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.अंजनवाडी, मौ.कामठा व मौ.पिंपरी (ता.औंढा-नागनाथ, जि.हिंगोली) ही गावे मागील वर्षी नदीला आलेल्या पुरामुळे बाधित झाल्यामुळे शासनाने सदर गावाचे पुनर्वसन केलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने पुनर्वसन केलेली तिन्ही गावे अद्यापही मुलभूत नागरी सुविधांपासून वंचित असून या गावांमध्ये कोणत्याही प्रकारच्या मुलभूत विकास योजना राबविण्यात आल्या नसल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुलभूत सोयी-सुविधांपासून वंचित असलेल्या या गावांसाठी गावनिहाय मौ.अंजनवाडीसाठी रुपये १ कोटी, मौ.कामठासाठी रुपये ५० लाख व मौ.पिंपरीसाठी रुपये ५० लाख इतका निधी शासनाने उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी तेथील तिन्ही गावांच्या ग्रामस्थांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री तसेच प्रधान सचिव, महसूल विभाग, (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन) यांचेकडे दिनांक २३ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने मुलभूत सोयी-सुविधांपासून वंचित असलेल्या या तिन्ही गावांनी केलेल्या मागणीनुसार निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सन १९७६ पूर्वीच्या प्रकल्पामुळे पुनर्वसित कामठा व जोडपिंपरी या गावठाणातील नागरी सुविधा कामांच्या अंदाजपत्रकांना दिनांक १९/०१/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून सदर कामांसाठी पहिल्या टप्प्यात दि.०४/०६/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निधी

असुधारित प्रत

वितरीत करण्यात आला आहे.

ता.प्र.क्र.३९९३९...

श्री.विजय वडेट्टीवार...

(३) हे खरे आहे.

(४) सदर निवेदनाच्या अनुषंगाने सदरील गावात विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत आवश्यक तो प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, हिंगोली यांना शासन पत्र दि.२४.०८.२०२१ अन्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार सविस्तर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.चंद्रकांत उर्फ राजुभैय्या नवघरे : अध्यक्ष महोदय, उक्त तारांकित प्रश्नातील उप प्रश्न १, २, ३ मधील बाबी खऱ्या आहेत काय, उप प्रश्न क्र.४ मध्ये नमूद मागणीनुसार निधी वितरित करण्यात आला आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? कामठा व पिंपरी गावाच्या संदर्भात मंत्री महोदय यांनी स्पष्टीकरण दिले आहे. सन १९६४ मध्ये धरण अस्तित्वात आले त्यावेळी दोन्ही गावे पुनवर्सित झाली होती व त्यानंतर अंजनवाडी गाव वसलेले असून त्याचे नाव पुनवर्सित गावांच्या यादीत नाव नाही.

श्री.विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य यांनी त्यांच्या मतदारसंघातील तीन गावांचा उल्लेख केला असून त्यापैकी २ गावे प्रकल्पग्रस्त आहेत व मौजे अंजनवाडी हे गाव पूरबाधित आहे. सिद्धेश्वर धरण, ता.औंढा-नागनाथ या धरणाचे काम १९६८ मध्ये पूर्ण झाले आहे. त्यामुळे बाधित झालेल्या कामठा व पिंपरी गावाचे पुनर्वसन सन १९६५ पूर्वी झाले आहे. अंजनवाडी गाव पूरबाधित असल्याने त्या गावातील लोकांनी स्वेच्छेने त्यांचे पुनर्वसन करुन घेतले आहे. त्या गावास इतर योजनांतून सर्व नागरी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. सन्माननीय सदस्य यांचे म्हणणे आहे की, कामठा व पिंपरी या गावांना नागरी सुविधा पुरविल्या नाहीत. परंतु उक्त गावांना १ ते १८ नागरी सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. काही सुविधांच्या बाबी नियमात बसत नसल्याने त्यांची अतिरिक्त मागणी होती व लोकप्रतिनिधी यांचाही आग्रह होता. त्यांचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी विभागास दिनांक १९ जानेवारी रोजी प्राप्त झाला आहे. त्यानुसार जोड पिंपरीसाठी

**ता.प्र.क्र.३९९३९...**

श्री.विजय वडेट्टीवार...

४३ लक्ष रुपये व कामठा गावासाठी १९ लक्ष रुपये मंजूर केले आहेत. त्यांना पहिल्या टप्प्यात १० टक्क्यांप्रमाणे ४.४ लक्ष रुपये जोड पिंपरी गावासाठी व १.९० लाख रुपये कामठा गावासाठी उपलब्ध करुन दिल आहेत.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ३९९३९.......

श्री.विजय वडेट्टीवार....

दुसऱ्यांदा दिनांक ४.३.२०२० रोजी देखील मौजे पिंपरीला ५ लाख ७५ हजार आणि मौजे कामठा गावाला ४ लाख ५ हजार रुपये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. या दोन्ही गावातील कामांसाठी नागरिकांनी प्रशासकीय मान्यतेप्रमाणे पुन्हा मागील केली तर मौजे पिंपरीसाठी ४५ लाख रुपये आणि मौजे कामठासाठी १९ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

अध्यक्ष महोदय, पुनश्च: एकदा मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, ज्या दोन्ही गावांचे सन १९६५ पूर्वी पुनर्वसन झालेले आहे, त्या दोन्ही गावांना आवश्यक सर्व नागरी सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. त्या दोन्ही गावांनी अतिरिक्त सुविधाबाबतचा प्रस्ताव सादर केला होता, तो प्रस्ताव शासनाने मान्य केलेला आहे. मागणी केल्याप्रमाणे काही निधी वितरीत देखील केलेला आहे. उर्वरित निधी उपलब्ध करुन देण्यासाठी संबंधित दोन्ही गावांचा प्रस्ताव मागवून तो निधी देण्यात येईल.

डॉ.देवराव होळी : अध्यक्ष महोदय, आताच मंत्री महोदयांनी सन १९६५ पूर्वी पुनर्वसित झालेल्या गावांना नागरी सुविधेसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत आश्वासित केले आहे.

अध्यक्ष महोदय, सन १९६२ ते सन १९७२ च्या दरम्यान गडचिरोली जिल्ह्यामध्ये बंगाली बांधवांचे ४८ गावे पुनर्वसित झालेले आहेत. त्या गावांमध्ये कोणत्याही प्रकारच्या मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत. सदरहू ४८ गावांना मौजे कामठा व मौजे पिंपरी गावाच्या धर्तीवर सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करुन तेथील सर्व नागरिकांना न्याय देणार आहात काय व उक्त कामांसाठी किती दिवसांमध्ये निधी उपलब्ध करुन देणार आहात?

श्री.विजय वडेट्टीवार : अध्यक्ष महोदय, सदरहू ४८ पुनर्वसित गावांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत प्रस्ताव मागविण्यात येईल. त्यानंतर सन्माननीय

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ३९९३९.......

श्री.विजय वडेट्टीवार....

सदस्य डॉ.देवराव होळी यांच्याशी चर्चा करुन सदर गावांसाठी जे जे करता येईल, ते ते करण्यात येईल.

---------

यानंतर श्री.कुलकर्णी........

असुधारित प्रत

**राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाली नसल्याबाबत**

**(७) * ३९३३२ श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.टेकचंद सावरकर (कामठी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), डॉ.डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे (हातकणंगले), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत शेतकऱ्यांचे रुपये २ लक्ष पर्यंत कर्ज माफीचा आदेश निर्गमित करुन दोन वर्षाचा कालावधी होऊनही राज्यातील हजारो शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासुन वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रुपये ५० हजार पर्यंत प्रोत्साहनपर अनुदान देण्याची घोषणा करुनही या संदर्भात शासन निर्णय निर्गमित न केल्यामुळे अनेक शेतकरी या पासुन वंचित राहिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोर्टलच्या तांत्रिक अडचणीमुळे तसेच आधार प्रमाणीकरण करण्यात न आल्याने शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळू शकला नाही, हे ही खरे आहे काय,

ता.प्र.क्र. ३९३३२.......
(४) असल्यास, कर्जमुक्ती व प्रोत्साहनपर भत्ता याची अंमजबजावणी योग्य प्रकारे होत नसल्याने आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकऱ्यांना जाहिर केलेली कर्जमाफी व प्रोत्साहनपर रक्कम विनाविलंब अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) नाही.
(२) होय.
(३) व (४) नाही.
(५) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत आधार प्रमाणीकरण झालेल्या ३२.३९ लाख कर्जखात्यांपैकी ३१.७१ लाख कर्जखात्यांना रु. २०,२४४ कोटीचा लाभ देण्यात आला आहे. योजना पूर्णत्वास नेण्याच्या हेतूने प्रधान सचिव (सहकार व पणन) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०८.०२.२०२२ व दिनांक ११.०२.२०२२ रोजी आढावा सभा घेण्यात आल्या आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.कृष्णा गजबे : अध्यक्ष महोदय, कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांच्याबाबतचा हा प्रश्न आहे.

अध्यक्ष महोदय, महाविकास आघाडी सरकारने महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्ज मुक्ती योजना राबविलेली आहे. परंतु अद्याप अनेक शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळू शकला नाही. अनेक लाभार्थी या योजनेपासून वंचित राहिलेले आहेत. जे शेतकरी नियमित कर्जफेड करीत आहेत, त्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपये देण्यात येतील, असे उप मुख्यमंत्री महोदयांनी आश्वासित केले होते. परंतु शासनाने अद्याप उक्त आश्वासनाची पूर्तता केलेली नाही.

अध्यक्ष महोदय, दुसरी बाब अशी आहे की, महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्ज मुक्ती योजनेच्या माध्यमातून २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ करण्यात येईल, असा शासनाने निर्णय घेतला होता. तसेच ज्या शेतकऱ्यांचे कर्ज २ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, अशा शेतकऱ्यांनी उर्वरित कर्जाची रक्कम भरल्यानंतर त्यांचे देखील

ता.प्र.क्र. ३९३३२.......

श्री.कृष्णा गजबे......

२ लाख रुपयांचे कर्ज माफ करण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. परंतु अशाही शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेचा लाभ मिळालेला नाही. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी नियमित कर्जफेड केलेली आहे, अशा शेतकऱ्यांना ५० हजार रुपये देणार आहात काय व ज्या शेतकऱ्यांनी २ लाख रुपयांवरील कर्जाची रक्कम भरलेली आहे, अशा शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेचा लाभ देणार आहात काय?

श्री.बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, सन २०१५ ते सन २०१८ या दरम्यान राज्यामध्ये नैसर्गिक आपत्ती आल्यामुळे व दुष्काळ पडल्यामुळे सन २०१९ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची योजना जाहीर केलेली आहे. उक्त योजनेच्या माध्यमातून अल्पमुदतीचे कर्ज माफ करण्यात येईल, असेही जाहीर करण्यात आले होते.

यानंतर श्री.कुलकर्णी.......

असुधारित प्रत

ता.प्र.क्र. ३९३३२....

श्री. बाळासाहेब पाटील....

अध्यक्ष महोदय, पात्र शेतकऱ्यांचे ३२ लाख ८२ हजार खाते होते. त्यापैकी अधार प्रमाणिकरण झालेल्या खात्यांची संख्या साधारणपणे ३२ लाख इतकी होती. शेतकऱ्यांना साधारणपणे २० हजार २५० कोटी रुपयांची रक्कम देण्यात आली. काही खात्यांचे आधार प्रमाणिकरण पूर्ण झालेले नाही. शेतकऱ्यांचे अंगठ्याचे ठसे न उमटणे, राहत्या ठिकाणी शेतकरी नसणे, ते परगावी जाणे अशा काही बाबी यात आहेत. त्यामुळे काही लोक यापासून वंचित राहिलेले आहेत. काही बँकेचे राष्ट्रीयकृत बँकेमध्ये विलिनीकरण झाल्यामुळे काही खाती अपडेट होऊ शकली नाहीत. ज्यांचे आधार प्रमाणिकरण झालेले आहे, त्यांना ही रक्कम देण्यात आली आहे. कोरोनानंतर राज्याच्या महसुलामध्ये अपेक्षित वाढ होऊ शकली नाही. याचा परिणाम अनेक योजनांवर झालेला आहे. त्याप्रमाणेच याही योजनेवर परिणाम झालेला आहे. ही योजना राबवित असताना असा दृष्टीकोन ठेवण्यात आला की, फर्स्ट कम फर्स्ट.... याचा अर्थ बँकांनी यात पुढाकार घ्यावयास हवा होता. बँका पुढे आल्यामुळे हे काम सुरळीतपणे होण्यास मदत झाली आहे. पुरवणी मागण्याद्वारे ८२ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यामाध्यमातून उर्वरित योजना पूर्ण केली जाईल.

श्री. चंद्रकांत पाटील : अध्यक्ष महोदय, कर्जमाफी योजनेमध्ये किती तालुक्यांमध्ये किती बोगस प्रकरणे निदर्शनास आली आहेत ? बोगस प्रकरणातील रकमेची पुनर्वसुलीची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे काय ? माननीय मंत्री हे अभ्यासू आहेत. मंत्री महोदयांनी उत्तर देण्यापूर्वी मी एक विनंती करतो. माननीय मंत्री या विषयाचे उत्तर व्यवस्थित देतील. जर मला योग्य उत्तर मिळाले नाही तर मी हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल करु इच्छितो. याचे कारण असे की, मंत्री महोदयांना या प्रश्नाच्या उत्तरामध्ये तालुक्यासह आकडेवारी मांडावी लागेल. दुसरा मुद्दा असा आहे की, आर्थिक अडचणीमुळे ५० हजार रुपयांचे अनुदान शेतकऱ्यांना न देण्याचा शासनाने निर्णय केला आहे काय ? याचे कारण असे की, सदरहू योजना ही सन २०१९ मधील आहे. वेळेवर कर्ज भरणा करणाऱ्यांसाठी प्रोत्साहन योजना सुरु केली होती.

ता.प्र.क्र. ३९३३२....

श्री. चंद्रकांत पाटील.....

त्यामुळे आता हे प्रोत्साहन अनुदान न देण्याचा शासनाने निर्णय केला आहे काय ? असा माझा दुसरा प्रश्न आहे.

श्री. बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी काही तालुक्यांमधील बोगस प्रकरणाबाबतचा मुद्दा मांडला आहे. मी सांगू इच्छितो की, बोगस प्रकरणे आमच्या निदर्शनास आली नाहीत. मी सुरुवातीलाच सांगितले की, यात बँकांनीच पुढाकार घेतला व त्यांनी पुढची कार्यवाही केली आहे. आधार प्रमाणिकरण करण्यामध्ये बँकांनी मदत केल्यामुळे ही योजना सुरळीत झाली आहे. राज्य सरकारने निर्णय केला की, नियमित कर्जाचा भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार व आम्ही देखील अनेकदा बाहेर उल्लेख केला की, राज्यात कोरोनाचे संकट आल्यामुळे राज्यात आर्थिक अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे हे अनुदान देण्याची कार्यवाही करता आली नाही. परंतु मी सांगू इच्छितो की, हे अनुदान देण्याचे शासनाने नाकारले नाही. राज्याची आर्थिक घडी सुरळीत झाल्यानंतर हे अनुदान देण्याचा राज्य सरकारचा मानस आहे. सहकार, पणन विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०८/०२/२०२२ व दिनांक ११/०२/२०२२ रोजी आढावा बैठक घेण्यात आली आहे. यामाध्यमातून माननीय वित्त मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे. त्यानंतर ही कारवाई केली जाईल.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, कोरोना संकटामुळे निधी कमी झाला आहे, असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. परंतु मी विचारु इच्छितो की, याच विषयाकरिता राज्य सरकारने निधी कमी का दिला आहे ? यावर राज्य सरकारने गदा का आणली आहे ? पुरवणी मागण्यांमध्ये राज्य सरकारने कशासाठी निधी दिलेला आहे, हे आपण पहावे. इतर सर्व गोष्टींकरिता निधी उपलब्ध करुन देता येतो. परंतु शेतकऱ्यांकरिता शासनानेच घोषित केलेल्या योजनेसाठी निधी उपलब्ध नाही. याचा

ता.प्र.क्र. ३९३३२....

श्री. देवेंद्र फडणवीस.....

अर्थ असा की, या राज्य सरकारला शेतकऱ्यांना हे पैसे द्यावयाचे नाहीत. ज्या गोष्टी दोन वर्षानंतर केल्या तरीही चालू शकतात अशा बाबींना निधी उपलब्ध करुन दिला जात आहे. हे सरकार स्मारकांना निधी उपलब्ध करुन देत आहे.

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३९३३२.....

श्री.देवेंद्र फडणवीस.....

परंतु शेतकऱ्यांच्या योजनेला मात्र पैसे दिले जात नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर पैसे कधी मिळतील हे मंत्री महोदयांनी स्पेसिफिकली सांगितले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, २ लाख रुपयांच्या वर ओ.टी.एस. केले जाणार होते. त्याला देखील ३ वर्षे होत आले आहेत. त्यामुळे ते ओ.टी.एस. रेंजच्या बाहेर चालले आहे. त्यावर पुन्हा नव्याने व्याज चढत आहे व अडचणी वाढत आहेत. त्यामुळे माझा प्रश्न आहे की, ओ.टी.एस. च्या संदर्भातील योजना कधी सुरु करणार आहात ?

अध्यक्ष महोदय, माझा तिसरा मुद्दा असा आहे की, ज्या शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आली त्यांना पुन्हा नव्याने कर्ज मिळालेले नाही. त्या शेतकऱ्यांना नव्याने कर्ज मिळाले पाहिजे यासाठी राज्य सरकार काय कार्यवाही करणार आहे ?

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी विचारलेले तीनही प्रश्न राज्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. ही गोष्ट खरी आहे की, माननीय श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली त्यावेळी त्यांनी या तीन घोषणा केल्या होत्या. परंतु लगेचच मार्च महिन्यात कोरोनाची साथ आली व परिस्थिती गंभीर झाली. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने मी सभागृहाला व महाराष्ट्रातील तमाम जनतेला सांगू इच्छितो की, यासंदर्भात मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्यात येईल. ५० हजारांचा व दोन लाखांच्या पुढील असे जे दोन प्रश्न आहेत त्यापैकी एक प्रश्न यावर्षी व एक प्रश्न पुढील वर्षी धसास लावला जाईल हा या निमित्ताने मी सभागृहाला शब्द देतो.

तसेच तिसरा मुद्दा असा आहे की, ज्या शेतकऱ्यांची कर्जमाफी होऊन खाते क्लिअर झाले आहे त्यांनाही नव्याने कर्ज मिळत नाही. आम्ही यासंदर्भात सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, एस.एल.बी.सी. बँक आणि राष्ट्रीयकृत बँकांना देखील पुन्हा सूचना देऊ. जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या तर राज्य स्तरावर माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात समिती असते.

ता.प्र.क्र.३९३३२.....

श्री.अजित पवार.....

या समितीच्या आढावा बैठकीमध्ये सूचना देण्यात येतील. परंतु कर्जमाफी केल्यानंतर पीक कर्ज घेण्याचे प्रमाण वाढले असल्याचे दिसत आहे. शेतकऱ्यांना ३ लाख रुपयांपर्यंत शून्य टक्के व्याजाने कर्ज पुरवठा केला जातो. त्यासाठी सुमारे ९५० ते ९६० कोटी रुपये खर्च केले जातात. यावेळी देखील या खर्चाची राज्य सरकारची तयारी आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांना माझी एवढीच विनंती आहे की, एस.एल.बी.सी. च्या माध्यमातून किती शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले व त्यापैकी किती शेतकऱ्यांना पुन्हा नव्याने कर्ज मिळाले याची माहिती घेऊन पटलावर ठेवणार का ?

श्री.बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, सदर माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, सन २०१६ व सन २०१९ अशा दोन वेळा कर्जमाफीच्या घोषणा करण्यात आल्या. सन २०१९ च्या कर्जमाफी संदर्भातील उत्तर माननीय उप मुख्यमंत्र्यांनी आताच दिले. शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर ५० हजार रुपये देण्याचे त्यांनी मान्य केले आहे.

अध्यक्ष महोदय, खरे तर सन २०१६ च्या कर्जमाफी योजनेपासून आजही अनेक शेतकरी वंचित आहेत. त्यानंतर कट ऑफ डेट टाकून महात्मा ज्योतिबा फुले कर्जमाफी योजना लागू करण्यात आली. सन २०१६ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज स्वाभिमानी शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर करण्यात आली होती. अनेक शेतकरी या दोन्ही कर्जमाफी योजनांपासून वंचित राहिले आहेत. वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांचा या घोषणांच्या स्पर्धेमध्ये काहीही दोष नाही, असे माझे प्रामाणिक मत आहे. त्यामुळे दोन्ही कर्जमाफी योजनांमधून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांचा कर्जमाफीमध्ये समावेश केला जाईल का ?

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३९३३२.....

श्री.बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, डिसेंबर, २०१९ मध्ये नागपूर अधिवेशनादरम्यान माननीय मुख्यमंत्र्यांनी कर्जमाफी योजनेची घोषणा केली. सर्वसाधारणपणे नवीन कर्जमाफीची घोषणा करीत असताना पूर्वीची कर्जमाफी योजना पूर्ण झालेली आहे असे गृहित धरुनच आपण पुढे जात असतो. मी मघाशी देखील सांगितले की, या कर्जमाफी योजनेमध्ये व आधार प्रमाणिकरणामध्ये बँकांनी पुढाकार घेतला.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

ता.प्र.क्र.३९३३२...

श्री. बाळासाहेब पाटील...

लोकांना किंवा शेतकऱ्यांना त्रास न होता ही योजना झाली. त्यामुळे लोकांच्या या योजनेच्या बाबतीत कोणत्याही तक्रारी नाहीत. म्हणून ही योजना पूर्ण करणे शासनासमोरील उद्दिष्ट आहे आणि म्हणून आम्ही ती योजना लवकरच पूर्ण करु.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. देवेंद्र फडणवीस यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारला आहे आणि म्हणून आम्हाला तारखेनुसार स्पेसिफिक उत्तर अपेक्षित आहे. याचे कारण स्वाभाविकपणे आपल्या लक्षात असेल की, ३ दिवसांपूर्वी श्री. सुरज जाधव नावाच्या शेतकऱ्यांने विष प्राशन करुन आत्महत्त्या केली आणि त्याचा व्हीडीओ काढला की, पुढचा जन्म शेतकऱ्याच्या पोटी नाही.

काल पोंभुर्णे येथील एका शेतकऱ्याने आत्महत्त्या केली. पुणे जिल्ह्यामध्ये कधी शेतकऱ्यांची आत्महत्त्या होत नव्हत्या, त्याही आत्महत्त्या वाढू लागल्या आहेत. जानेवारी ते नोव्हेंबर २०२१ या ११ महिन्यांच्या कालावधीत विदर्भात १३००, औरंगाबाद विभागात ७७३, अमरावती विभागात ११२८ मिळून अशा चार ते सव्वा चार हजार शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या आहेत. माझा या उत्तरावर आक्षेप आहे. या संदर्भातील निश्चितता काय म्हणते... आपण मागच्या वर्षी अर्थसंकल्प मांडला आणि त्या अर्थसंकल्पामध्ये घोषणा केली.... नुसती घोषणाच केली नाही तर सरकारने अभिनंदन स्वीकारले, शुभकामना घेतल्या, गावोगाव बोर्ड लावले. सोशल मिडीयामधून स्वत:ची पाठ थोपटून घेतली की, नियमित कर्ज भरणाऱ्यांच्या खात्यावर आम्ही ५० हजार रुपये टाकू. आता नवीन अर्थसंकल्प येत आहे आणि आपण तेच उत्तर देत आहोत की, आम्ही पुन्हा एकदा विचारु. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी इतकी उदासीनता आहे. आपण ताटातील अन्न जेव्हा खातो तेव्हा दिवसातून ३ वेळा शेतकऱ्यांची आठवण आली पाहिजे. अर्थसंकल्पामध्ये घोषणा केली होती ती घोषणा येत्या ३१ मार्चपर्यंत पूर्ण होईल काय, हा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, सन्माननीय सदस्य श्री. नाना पटोले म्हणाले की, आपल्या यासंबंधी छत्रपती

ता.प्र.क्र.३९३३२...

श्री. सुधीर मुनगंटीवार...

शिवाजी महाराज आणि महात्मा फुले यांच्या नावाने २ योजनांच्या घोषणा झाल्या आहेत. ही दोन्ही नावे इतकी मोठी आहेत की, शब्द दिला की तो पूर्ण झाला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, या दोन्ही योजनांमधून शेतकरी वंचित राहिले आहेत. याबद्दल आपण काही बघत नाही. माझी उपमुख्यमंत्री महोदयांना हात जोडून विनंती आहे. ही विनंती एकदा नाही तर हजारदा हात जोडून विनंती आहे की, आपण यासंबंधी तारीख सांगावी. कारण माननीय राज्यपालांच्या ३ अभिभाषणांमध्ये याचा उल्लेख वारंवार आला आहे की, शासन ५० हजार रुपये देईल. जाहीर भाषणात ५० हजार रुपये देतो, बांदावर गेले की, ५० हजार रुपये देतो आणि येथे विधानसभेत आलो की, उत्तरामध्ये ५० हजार रुपये देतो असे शासन सांगत आहे. पण तारीख "हम बताते नहीं". म्हणून माझी उपमुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, अर्थसंकल्पात इतर कोणत्याही गोष्टीला थोडा कट लावावा लागला तरी तो लावा. पण आरोग्य विषय आणि शेतकरी या दोन विषयांसाठी स्पष्ट घोषणा सरकारने करावी.

The Deputy Chief Minister : Suggestion for action.

श्री. रणधीर सावरकर : अध्यक्ष महोदय, माननीय उपमुख्यमंत्री जिल्हा बँकेचे अनेक वर्षे अध्यक्ष राहिले आहात. एक तांत्रिक प्रश्न गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. शेतकऱ्यांना आपण जे क्रॉप लोन देतो त्याचे व्याज ३६५ दिवस झाल्यानंतर लावले पाहिजे की, ३१ मार्च ही कट ऑफ तारीख असली पाहिजे. पीक कर्ज आपण जून आणि जुलै महिन्यांमध्ये वितरित करतो. पण शेतकऱ्याने ३१ मार्चपूर्वी कर्ज भरले नाही तर त्यावर व्याज लावले जाते. त्यामुळे ती कट ऑफ तारीख कोणती असली पाहिजे, हा पहिला प्रश्न आणि दुसरा प्रश्न असा आहे की, दोन्ही कर्जमाफी योजनांमध्ये शासनाने पुनर्गठण केले तर त्याचा या कालावधीत समावेश करण्यात येईल काय ?

ता.प्र.क्र.३९३३२...

श्री. बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी व्याजाच्या बाबतीत या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला आहे. बऱ्याचशा सदस्यांची किंवा शेतकऱ्यांची अशी मागणी आहे की, यामधून अधिकच्या व्याजाचा भूर्दंड बसतो. त्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या सूचनेनुसार कार्यवाही करण्यात येईल.

**उपाध्यक्ष :** प्रश्नोत्तराचा तास आता संपलेला आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे...

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, प्रश्नोत्तराचा तास संपलेला असला तरीही तो संपण्यापूर्वी माननीय मंत्र्यांनी संबंधीत प्रश्नाचे समर्पक उत्तर देणे अपेक्षित होते. त्यापूर्वीच प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे असे समजून ते उत्तर न देता जागेवरच बसून राहिले आहेत. सन्माननीय सदस्यांनी दोन प्रश्न विचारलेले होते परंतु माननीय मंत्र्यांनी त्याचे उत्तरच दिलेले नाही.

श्री. बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, मी प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे. माझे उत्तर संपल्यानंतर प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

-------

असुधारित प्रत

## सन्माननीय सदस्य श्री. रवि राणा यांच्यावर पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यासंबंधी

(सन्माननीय सदस्य श्री. रवि राणा वेलमध्ये येऊन फलक फडकवितात.)

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य आपण जागेवर बसा.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य आपल्या भावना मांडतील. सन्माननीय सदस्य श्री. रवि राणा दिल्लीला असताना त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. आम्ही गुन्ह्याचे समर्थन करीत नाही. कारण कोणत्याही कमिशनरवर अशा प्रकारे शाई फेकणे निषेधार्ह आहे, चूक आहे, त्यांना सजा झालीच पाहिजे. परंतु गुन्हेगाराशी किंवा गुन्ह्याशी कनेक्शन नसताना... अध्यक्ष महोदय, राष्ट्रवादी पक्षाच्या दोन कार्यकर्त्यांनी काही केले तर माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांना आपण फासावर लटकवणार काय ? अशा प्रकारे दिल्लीमध्ये असणाऱ्या सन्माननीय सदस्यांवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३०७ चा गुन्हा लावण्यात आला आहे. अक्षरश: सुरुवातीला मूळ गुन्हेगारावर छोटा गुन्हा लावला. मग कोणाचे तरी फोन आल्यानंतर त्याच गुन्हेगारावर भारतीय दंड संहितेच्या कलम ३०७ चा गुन्हा दाखल करण्यात आला आणि जे सन्माननीय सदस्य चार दिवसांपासून दिल्लीमध्ये आहेत त्यांच्यावर सुद्धा भारतीय दंड संहितेच्या कलम ३०७ चा गुन्हा कसा लागू शकतो ? या ठिकाणी कोणत्या प्रकारचे राज्य आहे ? अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रवि राणा यांना बोलू दिले पाहिजे म्हणून मी माझे म्हणणे थांबवतो. परंतु हे योग्य नाही. आपण आमचे संरक्षक आहात. या राज्यामध्ये अशा प्रकारे भारतीय दंड संहितेचे कलम ३०७ बेकायदेशीरपणे लावले जात असेल तर ज्यांनी हे कलम बेकायदेशीरपणे लावले त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. अन्यथा पोलीस बेछूट होतील. आज तुमचे राज्य आहे. परंतु आपण हे लक्षात ठेवा की, पोलीस जर एकदा बेछूट झाले तर या राज्यामध्ये काहीच उरणार नाही. त्यामुळे माझी विनंती आहे की, आपण सन्माननीय सदस्य श्री. रवि राणा यांना बोलू द्यावे आणि आम्हाला संरक्षण द्यावे.

असुधारित प्रत

श्री. रवि राणा : अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये मी माझ्या भावना व्यक्त करणार आहे. मी आपल्याला पूर्ण पार्श्वभूमी सांगेन त्यावरून आपण मला न्याय द्याल, अशी अपेक्षा आहे. राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त अनेक शिवभक्तांनी राजापेठ, फ्लायओव्हरवर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविला. १२ तारखेला पुतळा बसविल्यानंतर त्या ठिकाणी दूग्ध अभिषेक झाला आणि आरती देखील झाली. तसेच तिथे मोठ्या प्रमाणावर आराधना झाल्या. तेव्हा अमरावती शहरात दिवाळीसारखे वातावरण झाले होते आणि कोणाचाही तक्रार नव्हती. पाच दिवसानंतर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा त्या फ्लायओव्हरवरुन छन्नी हातोड्याने मनपा आयुक्त आणि पोलीस आयुक्त यांच्या संगणमताने काढल्या जाऊन अतिक्रमण विभागाच्या कचऱ्याच्या गोडाऊनमध्ये टाकण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे आराध्य दैवत आहेत. आमच्या दैवताला छन्नी हातोडयाने काढून त्या गोडाऊनमध्ये टाकले जात असेल तर त्यावर शिवभक्तांच्या भावना दुखवल्या गेल्या. त्यामुळे ९ तारखेला काही शिवभक्तांनी मनपा आयुक्तांवर शाई फेकली. त्याचे आम्ही समर्थन करणार नाही तर निषेधच करणार आहोत. परंतु त्या दिवशी मी दिल्ली येथे रेल्वे विभागाच्या बैठकीमध्ये उपस्थित असताना मला फोन आला की, "अमरावतीमध्ये तुमच्यावर भारतीय दंड संहितेच्या कलम ३०७ आणि कलम ३५३ चा गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे." मी जेव्हा त्याची माहिती घेतली तेव्हा पोलीस आयुक्त श्रीमती आरती सिंह मला सांगतात की, " सरकारमधील काही प्रमुख लोकांनी मला हा गुन्हा दाखल करायला सांगून श्री. रवि राणा यांना अटक करा असे सांगितले." त्यानंतर माझ्या घरी १०० ते १५० पोलीस जातात.

यानंतर श्रीमती करंदीकर....

श्री. रवि राणा....

माझ्या घरात वृध्द आई-वडील आहेत. माझ्या आईचे गुडघ्याचे ऑपरेशन झालेले आहे. असे असतानाही रात्री ३ वाजता १५० पोलिसांनी माझ्या घरात घुसून तपासणी केली. या घरातील माननीय खासदार श्रीमती नवनित राणा यांना देखील ताब्यात घेतले. त्यांचाही अपमान केला. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, [***] यांनी पोलीस आयुक्त यांना फोन केला. माझ्याकडे त्याचा पुरावा पेन ड्राईव्हमध्ये आहे. त्यांनी असा फोन केला की, श्री.रवि राणा यांना अटक करा. माननीय स्व. आर. आर. पाटील यांची मला आज आठवण येत आहे. त्यांच्यासारखे गृह मंत्री आपल्या राज्याला हवे होते. या राज्यामध्ये जर आपण श्री.वाझे यांच्यासारखे गुन्हेगार अधिकारी निर्माण केले तर आपली देखील माननीय श्री. अनिल देशमुख यांच्यासारखी परिस्थिती होईल, हे विसरु नका. ही केवळ माझी भावना नाही तर या संपूर्ण सदनाची भावना आहे. माझ्या सारख्या आमदारावर जर कलम ३०७, ३५३ अंतर्गत गुन्हा दाखल होत आहे व त्या करिता आपण फोन केला असेल तर हे महाराष्ट्राचे दुर्भाग्य आहे. श्रीमती आरती सिंह या पोलीस आयुक्त आहेत. मनपा आयुक्त यांनी खोटा गुन्हा दाखल केला. ही घटना दीड वाजता झाली. रात्री १०.३० वाजता माझ्यावर गुन्हा दाखल होतो व आम्हाला सांगण्यात येते की, एवढा दबाव आहे की, रवि राणा दिसला तर त्यास गोळी मारुन टाका. असा जर दबाव असेल, अशी परिस्थिती असेल, मला अटक करा अशी मागणी असेल तर... जर मी खोटे बोलत असेल तर या पेनड्राईव्हमध्ये पुरावा आहे.....

**उपाध्यक्ष** : या बाबत शासनाने नोंद घ्यावी.

श्री. रवि राणा : अध्यक्ष महोदय, मी येथे फाशी घेईन. मला आपण फाशी द्या. या घटनेचा आपण तपास करावा त्याकरिता विधान मंडळाची समिती तयार करावी. पोलिस आयुक्तांचे निलंबन झाले पाहिजे, मनपा आयुक्तांवर कारवाई झाली

असुधारित प्रत

श्री. रवि राणा....

पाहिजे. अशा प्रकारे जर आमदारांना अटक होत असेल तर या विधानसभेवर कोणाचा विश्वास राहाणार नाही. येथे मी निषेध व्यक्त करतो. या घटनेमुळे संपूर्ण राज्याचा अवमान झालेला आहे. आपण मला न्याय द्यावा. पोलीस आयुक्त व मनपा आयुक्त यांचा मी या ठिकाणी निषेध व्यक्त करतो....

**उपाध्यक्ष :** आता सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी आपले म्हणणे मांडावे.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. रवि राणा यांच्या वर कलम ३०७, ३५३ अंतर्गत गुन्हा दाखल झाला. त्यांचे असे म्हणणे आहे की, ज्यावेळी गुन्हा घडला तेव्हा मी दिल्लीला होतो. सदनाचे कस्टोडीयन म्हणून आपण त्यांचे म्हणणे ऐकून घेतले आहे. या बद्दल माझे काहीही म्हणणे नाही....( अडथळा )

**उपाध्यक्ष :** आपण त्यांबा बोलू द्या. ज्या वेळी आपण बोलत होता तेव्हा आपल्याला कोणीही डिस्टर्ब केले नाही.

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, आपण त्यांचे म्हणणे ऐकून घ्या, असे माननीय विरोधी पक्ष नेते यांनी आपल्याला सांगितले. आपण त्यांचे म्हणणे ऐकून घेतले व आम्ही देखील ऐकून घेतले आहे. त्यांनी काय म्हटले या बद्दल मला काहीही आक्षेप नाही..(अडथळा ) या ठिकाणी मी उत्तर देत नाही.

श्री. गिरीष महाजन ( बसून ) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव हे मंत्री महोदय आहेत काय ?

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गिरीष महाजन, यांचे या सदनात लक्ष आहे काय ? मी हरकतीच्या मुद्यावर बोलत आहे. मी या ठिकाणी मंत्री म्हणून उत्तर देत नाही. या सदनात एखादा सदस्य जर [***] घेऊन त्यांच्यावर आरोप करणार असेल तर ते आरोप करण्यापूर्वी

श्री. भास्कर जाधव ....

त्यांनी विधानसभा नियम ३८ अन्वये आधी नोटीस देणे आवश्यक होते. मला हे जाणून घ्यायचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. रवि राणा यांनी [***] घेऊन असे विधान केले आहे की,

---

*** आदेशानुसार विलोपित मजकूर

यानंतर श्रीमती गिरप.....

असुधारित प्रत

श्री.भास्कर जाधव ...
"मला अटक करण्याकरिता म्हणून येथील पोलीस कमिशनर व अमरावती कार्पोरेशनचे कमिशनर यांना [***] फोन करीत होते.," असे ते म्हणाले. मला हे जाणून घ्यावयाचे आहे की, त्यांनी या [***] घेण्यापूर्वी आपल्याला नोटीस दिलेली आहे काय? आपल्याला जर नोटीस दिली नसेल तर त्यांचे म्हणणे, त्यांनी घेतलेले नाव कामकाजातून काढून टाकावे, असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**उपाध्यक्ष** : नोटीस न देता अशा पध्दतीने नाव घेऊन बोलणे काही बरोबर नाही. त्यामुळे सदरचा उल्लेख रेकॉर्डवरुन काढून टाकावा.

श्री.देवेद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, आपला निर्णय आहे. ते कामकाजामध्ये ठेवायचे की, नाही ठेवायचे ते आपण ठरवा. परंतु, जो मूळ मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे, त्यावर काही कारवाई होणार आहे की नाही? माझे असे म्हणणे आहे की, आपण [***] बाजूला ठेऊ. परंतु, मूळ मुद्दा असा आहे की, अशा प्रकारे कलम ३०७ अन्वये गुन्हा दाखल झाला. एका मिनिटात कोर्टाने स्थगिती दिली. प्रश्न नाही, त्यांना ते अटक करु शकले नाहीत. कारण ते चुकीचेच होते. परंतु, अशाप्रकारे जर सन्माननीय सदस्य व्हिक्टिमाईज होत असेल.... आम्ही आपल्या समोर आमच्या व्यथा मांडल्या. आपण आमचे कस्टोडीयन आहात. यावर पुढे काय होणार आहे, चौकशी होणार आहे काय, या सभागृहाची चौकशी समिती स्थापन होणार आहे काय, असे काही तरी आम्हाला समजले पाहिजे.

**उपाध्यक्ष** : सरकारने याची नोंद घ्यावी. .... (गोंधळ)... सन्माननीय सदस्य आपण नोटीस न देता देखील आपल्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी मी दिलेली आहे.

( सन्माननीय सदस्य श्री.रवी राणा वेलमध्ये येऊन
उपाध्यक्ष महोदयांसमवेत बोलतात)

सन्माननीय सदस्यांनी आपल्या जागेवर बसावे.

............

---

*** आदेशानुसार विलोपित मजकूर

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य
आपापल्या जागेवर उभे राहून घोषणा देतात.)

**पृ. शी. :** लेखी उत्तरे

**मु. शी. :** तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती
सभागृहाच्या पटलावर ठेवणे

श्री. प्राजक्त तनपुरे ( आदिवासी विकास राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने, "शासकीय आश्रमशाळांमध्ये मृत्युमुखी पडलेल्या मुलांच्या कुटुंबियांना आर्थिक भरपाई देण्याबाबत" या विषयावरील श्री.चंद्रकांत सोनावणे, वि.स.स. यांचा दिनांक २८ मार्च, २०१६ रोजीचा तारांकित प्रश्न क्रमांक ४८७१६ संदर्भात दिनांक १३ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या निवेदनातील आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवत आहे.

**उपाध्यक्ष** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे अधिक माहिती छापावी.)

................

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य आपापल्या

जागेवर उभे राहून घोषणा देतात.)

**पृ.शी. / मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्रीमती आदिती तटकरे (विधी व न्याय राज्यमंत्री): अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

**उपाध्यक्ष** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. सदरहू अहवाल विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

..............

डॉ.विश्वजित कदम (कृषी राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल व वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतो....(अडथळा).. सदरहू अहवाल सभागृहासमोर सादर करण्यास झालेल्या विलंबाची कारणे सोबत जोडली आहेत.

**उपाध्यक्ष** : लेखा परीक्षण अहवाल व वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत. सदरहू लेखा परीक्षण अहवाल व वार्षिक लेखे विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील.

............

श्री.अस्लम शेख (वस्त्रोद्योग मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपाध्यक्ष** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. सदरहू अहवाल विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

..............

यानंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य हौदात येऊन एकत्रितपणे घोषणा देत असतात.)

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, विरोधी पक्षाला सभागृहाचे कामकाज व्यवस्थित चालू द्यावयाचे आहे. शासनाने आमच्या मागणी संदर्भात काही तरी आश्वासन द्यावे. यासंदर्भात आपण सरकारला निदेश द्यावेत, अशी विनंती आहे.

**उपाध्यक्ष** : विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्य यांनी आपल्या जागेवर जाऊन बसावे. मंत्री महोदयांना उत्तर देऊ द्यावे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, हा एका सन्माननीय सदस्य यांचा प्रश्न आहे, असे समजून या विषयाचे गांभीर्य कमी होऊ देता कामा नये. मागील दीड दोन वर्षाच्या कालावधीत अशा प्रकारच्या प्रसंगामध्ये अधिक वाढ झाली आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुनिल प्रभू यांनी स्वत: सायंकाळी ५.४२ वाजता सन्माननीय सदस्य यांच्या अवमान संदर्भात २२ मिनिटे सभागृहामध्ये कथन केले होते. त्यांनी त्यावेळी सांगितले होते की, या २ वर्षांच्या कालावधीत प्रशासन अन्याय करीत आहे, अवमान करीत आहे, सन्माननीय सदस्यांच्या संदर्भातील मान सन्मानाची मर्यादा ओलांडत प्रशासन यंत्रणा वागत आहे. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री यांनी आश्वासन दिले होते की, या विषयाच्या संदर्भात आमदार महोदयांची समिती गठीत करण्यात येईल. या आश्वासनाची मी आठवण करुन देऊ इच्छित आहे. सदरहू आश्वासन शुक्रवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२१ रोजी देण्यात आले होते. अद्यापही सन्माननीय सदस्य यांच्या संदर्भात अवमानाच्या घटना पुन्हा पुन्हा होत आहेत. पोलीस यंत्रणा पूर्णपणे नेस्तनाबूत होत आहे. त्यामुळे अशा पद्धतीचे प्रसंग येतात. एका सन्माननीय सदस्यांवर खोट्या पद्धतीने गुन्हे दाखल करण्यात आले, एवढ्याच चौकटीमध्ये याकडे पाहू नये. अशा पद्धतीने पोलिसांनी गुन्हे दाखल केले. पोलीस यंत्रणेचे राजकियीकरण होत आहे. ते पूर्वी गुन्हेगारांचे होत होते. याकरिता सर्व पक्षिय आमदार महोदयांची समिती गठीत करणे गरजेचे आहे. पोलीस यंत्रणेवर १५,८२४ कोटी रुपये खर्च करण्यात येतात. हा खर्च पाण्यात जात आहे, असा हा खेळ सुरु झाला आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार...

अध्यक्ष महोदय, गृह मंत्री महोदय भावनिक आहेत, याची मला जाणीव आहे. त्यांच्याकडून मला अपेक्षा आहे. अन्यथा अशा कृतींमुळे त्यांचे ब्लड प्रेशर व शुगर वाढेल. गृह मंत्री महोदयांनी आमदार महोदयांच्या समितीची स्वत: घोषणा करावी. तिच्या माध्यमातून मागील २ वर्षांच्या कालावधीतील घडलेल्या घटनांच्या संदर्भात चिंतन करण्यात येईल. पोलीस यंत्रणेने कसेही वागणे योग्य नाही, हे थांबविले पाहिजे. वादाचा प्रतिवाद, बदला घेण्याची भावना, सूडाची भावना पुढे जाता कामा नयेत. आज आपल्या हाती आहे ते आपण पूर्ण केले पाहिजे, एवढीच माझी अपेक्षा आहे.

श्री.छगन भुजबळ (बसून) : अध्यक्ष महोदय, सीबीआय इतर सर्वच...

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदय बसून बोलले आहेत, त्यांचेकडे सन्माननीय सदस्य यांनी लक्ष देऊ नये.

श्री.सुधीर मुनगंटीवार (माईक ऑफ) : अध्यक्ष महोदय, या वयामध्ये त्यांच्यामध्ये सुधारणा व्हावी म्हणून मी बोलतो. पूर्वीच्या काळी ते डॅशिंग होते, त्यावेळी त्यांनी स्व.बाळासाहेब ठाकरे यांना अटक करण्याचे आदेश दिले होते. आता वयोमानानुसार त्यांनी संयम व शांतता बाळगली पाहिजे.

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, तपास यंत्रणा कशा पद्धतीने खराब होत चालल्या आहेत, हे मी सांगितले. सन्माननीय सदस्य यांनी केवळ महाराष्ट्राच्या पोलीस यंत्रणेबाबत सांगितले.

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, या देशातील तपास यंत्रणा कशा खराब होत चालल्या आहेत. त्यामुळे आपण सर्वांनी याबाबतचा अभ्यास केला तर अधिक चांगले होईल, असे मी माननीय गृह मंत्री यांना सांगत होतो.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सन्माननीय सदस्य श्री.रवि राणा यांनी अमरावती येथे घडलेल्या घटनेसंदर्भात आपल्या भावना येथे मांडलेल्या आहेत. ही बाब खरी आहे की, सदरहू दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची विनापरवानगी स्थापना करण्यात आली होती. जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय जिल्ह्यामध्ये कोठेही पुतळा बसविता येत नाही, असा या राज्यातील नियम आहे आणि तो सर्व ठिकाणी पाळला जातो. अमरावती येथे बसविण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची उंची ही अतिशय कमी होती. रस्त्यावरुन चालता-चालता सदर पुतळ्यास हात लावला तरी तो सहज लागेल, असा पुतळा बसविण्यात आला होता. त्यामुळे प्रशासनाने निर्णय घेऊन तो पुतळा काढण्याचे ठरविले होते. त्यासाठी अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्त महोदयांनी पोलिसांची मदत घेऊन त्यांच्या अधिकारामध्ये तो पुतळा काढण्याची कार्यवाही केली. ज्या दिवशी आयुक्त महोदयांवर शाईफेक करण्यात आली, त्या दिवशी अमरावतीमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाल्यामुळे पोलिसांना कठोर कारवाई लागली. मी देखील अनेक वर्षांपासून या सभागृहाचा सदस्य म्हणून काम करी आहे. सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावनेशी मी सहमत आहे. आपण दिल्ली येथे असताना देखील आपल्यावर कलम ३०७ अन्वये गुन्हा दाखल झाला असेल तर तो गुन्हा कशामुळे दाखल करण्यात आला, याची चौकशी करणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, सदर कृती करण्याबाबत [***] कोणत्याही प्रकारचे आदेश दिले नव्हते. ज्यावेळी एखाद्या शहरातील परिस्थिती स्फोटक बनते अशा वेळी [***] तेथील परिस्थितीची माहिती घेण्याचा प्रयत्न केला जातो. सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन गृह विभागातील कायदा व सुव्यवस्था विभागाच्या अतिरिक्त पोलीस महासंचालक यांच्यामार्फत उक्त प्रकरणाची चौकशी केली जाईल.

---

*** आदेशानुसार विलोपित मजकूर

असुधारित प्रत

श्री.दिलीप वळसे-पाटील.......

उक्त चौकशीचा concluding अहवाल प्राप्त झाल्यानंतर माननीय विरोधी पक्षनेते यांच्याशी चर्चा करण्यात येईल.

**उपाध्यक्ष :** आज सोमवार, दिनांक ७ मार्च, २०२२ रोजी स्थगन प्रस्तावाच्या एकूण ९ सूचना प्राप्त झालेल्या आहेत. परंतु आज....

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, आजच्या स्थगन प्रस्तावाच्या सूचना नाकारण्यापूर्वी एक अतिशय महत्त्वाचा मुद्दा मांडू इच्छितो.

अध्यक्ष महोदय, मगरवाडी ता. पंढरपूर जिल्हा सोलापूर येथील श्री.सुरज जाधव नावाच्या शेतकऱ्याने दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी फेसबुक लाईव्ह करुन भावना व्यक्त केली व त्यानंतर त्याने गोळया खाऊन आत्महत्या केली. त्याने व्हिडिओमध्ये असे म्हटले आहे की, "मला शेतकरी म्हणून पुन्हा जन्म घ्यावयाचा नाही. कारण शेतकरी हा असमर्थ व दुबळा असतो. या सरकारला शेतकऱ्यांची काळजी नाही. मी शेतकरी विरोधी धोरणाचा निषेध करतो" मी स्वत: त्याच्या कुटुंबातील सदस्यांशी चर्चा केलेली. त्यावेळी त्यांनी सांगितले की, ज्या वेळी पिकाला पाणी देण्याची योग्य वेळ होती, त्याचवेळी महावितरण कंपनीने कृषी पंपाचे कनेक्शन कापले. शासन रोज कृषी पंपाचे कनेक्शन कापत आहे. त्यामुळे एका शेतकऱ्याने आत्महत्या केली तर इतर अनेक शेतकरी देखील आत्महत्या करण्याच्या तयारीमध्ये आहेत.

यानंतर श्री.कुलकर्णी......

श्री. देवेंद्र फडणवीस.....

अध्यक्ष महोदय, आज अनेक शेतकरी आत्महत्या करीत आहेत. या सरकारला काय झाले आहे, हे मला समजत नाही. मागील अधिवेशनामध्ये माननीय उप मुख्यमंत्री यांनी सांगितले की, एक बिल भरले तरीही वीज तोडली जाणार नाही. परंतु या राज्याच्या माननीय उप मुख्यमंत्र्यांना ऊर्जा मंत्री महोदय ऐकायला तयार नाहीत. ते जाहीर घोषणा करतात की, वीज बिल भरले नसेल तर शेतीपंपाचे वीज तोडले जाईल. सुलतानी पद्धतीने शेती पंपाची वीज तोडली जात आहे. आज सुरज जाधव यांनी आत्महत्या केली आहे. असे अनेक सुरज जाधव सरकार तयार करीत आहे. या राज्यामध्ये शेतकऱ्यांना फेसबुक लाईव्ह करुन आत्महत्या करण्याची वेळ सरकारमुळे येत आहे. किमान सुरज जावध प्रकरणातून या सरकारने धडा घेतला पाहिजे आणि कृषि पंपाची वीज तोडणी तात्काळ थांबवावी. स्थगन प्रस्तावाबाबत माननीय अध्यक्ष जे निर्णय देतील तो अंतिम असतो. परंतु अधिवेशन सुरु असताना शेतकरी कृषि पंपाची वीज कापल्यामुळे आत्महत्या करीत असतील तर आम्ही यावर कोठे चर्चा करावी ? त्या शेतकऱ्यांच्या भावना आम्ही कोठे मांडाव्यात ? त्यामुळे मी विनंती करतो की, हा स्थगन प्रस्ताव आपण स्वीकारावा. तसेच सरकारला तात्काळ निदेश दिले पाहिजेत की, कृषि पंपाची वीज कापू नये. ती तात्काळ बंद करावी.

श्री. सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, मी आपणास एक विनंती करणार आहे. हा स्थगन प्रस्ताव आपण स्वीकारला पाहिजे. स्थगन प्रस्तावाबाबत विधानसभा नियमामध्ये जी तातडी आहे ती या विषयात आहे. मागील दीड ते दोन वर्षापासून शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. आता अधिवेशन सुरु आहे. या अधिवेशनात काही विषयावर चर्चा करु शकलो तर उद्या कोणी फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून आत्महत्या करणार नाही. कृषि पंपाचे वीज कापण्याचा विषय आहे. धानाचा बोनस देण्यात आला नाही. पीक विम्यामध्ये अनेक अडचणी आहेत. नियमित कर्ज भरणाऱ्यांना ५० हजार रुपयांचे अनुदान देण्यात आलेले नाही. धडक सिंचन विहीर, आवास योजना, रमाई आवास योजनेचे पैसे लाभार्थ्यांना देण्यात आलेले नाहीत. कंत्राटदारांना पायाभूत सुविधांसाठी निधी दिला पाहिजे. परंतु आता सर्वसामान्य

श्री. सुधीर मुनगंटीवार ......

शेतकऱ्यांचे, आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रश्न सुटले पाहिजेत, यासाठी प्राधान्य दिले पाहिजे. म्हणून आपण कदाचित असे म्हणू शकता की, हा विषय पुढील आठवड्यामध्ये घेतला जाईल. माननीय अध्यक्ष हे संवेदनशील आहेत. आपली संवेदनशीलता, आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी ही महत्त्वाची संधी आहे. हा स्थगन प्रस्ताव आपण स्वीकारावा. त्यातून शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न आपणास मांडता येणार आहेत. ही तातडीची बाब लक्षात घ्यावी. सुरज जाधव नावाच्या शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे. हा सुरज अस्ताला गेला आहे. असे अनेक सुरज अस्ताला जाऊ नयेत. राज्यातील अंधार दूर झाला पाहिजे. यादृष्टीने हा स्थगन प्रस्ताव स्वीकारावा, अशी मी आपणास विनंती करतो.

**उपाध्यक्ष :** आज एकूण ०९ स्थगन प्रस्तावाच्या सूचना प्राप्त झालेल्या आहेत. पंरतु आज सन २०२१-२२ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (पहिला दिवस) असल्यामुळे म.वि.स. नियम २६० (५) अन्वये स्थगन प्रस्ताव घेता येणार नाहीत. अत: या सर्व सूचनांस मी दालनात अनुमती नाकारली आहे. आज लक्षवेधी सूचना क्रमांक २ ही ऊर्जा विभागाशी संबंधित आहे. त्यावेळेस सविस्तर चर्चा करावी, अशी मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, ही अतिशय गंभीर घटना आहे. या घटनेवर राज्य सरकारने काही प्रतिक्रिया दिली पाहिजे. ती संध्याकाळपर्यंत दिलीतरी चालेल. एका शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे.

यानंतर श्री. चौधरी....

ॲड.अनिल परब : अध्यक्ष महोदय, आपण सांगितले आहे की लक्षवेधी क्रमांक-२ वर चर्चा करताना माननीय ऊर्जा मंत्री यासंदर्भात सविस्तर खुलासा करतील.

स्थगन प्रस्तावाच्या सूचनेवर निवेदन करण्याबाबत माननीय अध्यक्षांनी निर्देश दिले आहेत किंवा कसे याबाबत मला माहिती नाही... (अडथळा...) नोंद घेतली जाईल व माननीय अध्यक्षांचा निरोप माननीय ऊर्जा मंत्र्यांना कळविला जाईल.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, माननीय संसदीय कार्य मंत्री यांना या विषयाची गंभीरता लक्षात येत नाही, असे मला वाटते. एका शेतकऱ्याने फेसबुक लाईव्ह करुन आत्महत्या केलेली आहे. लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये याचे उत्तर येऊ शकत नाही. त्यामुळे सरकारने याबाबत किमान निवेदन तरी केले पाहिजे. आपण सरकारला तसे निर्देश दिले पाहिजेत.

ॲड.अनिल परब : अध्यक्ष महोदय, वीज कनेक्शन कापू नये अशी त्यांची मागणी होती. लक्षवेधी सूचना क्रमांक-२ चा विषय तोच असल्याने आपण निर्देश दिले आहेत की, लक्षवेधी क्रमांक-२ वरील चर्चेदरम्यान याचे उत्तर येईल. शेतकऱ्याच्या आत्महत्येसंदर्भात आपण निर्देश द्यावेत. त्याप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल.

श्री.सुधीर मुनगंटीवार : अध्यक्ष महोदय, माझी आपणास विनंती आहे की, आपण स्पेसिफिक दोन निर्देश द्यावेत. अर्थात, तो आपला अधिकार आहे. पहिली गोष्ट म्हणजे सरकारने यासंदर्भात निवेदन करावे. तसेच दुसरा निर्देश म्हणजे या कुटुंबाला ४८ तासांच्या आत आर्थिक मदत दिली पाहिजे. सदर आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबाचे अजून रडणे थांबत नाही. त्यामुळे आपण काहीतरी गंभीरता ठेवावी. सध्या विधीमंडळाचे अधिवेशन सुरु आहे. त्यामुळे सरकारने निवेदन करावे व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबास आर्थिक मदत द्यावी.

श्री.यशवंत माने : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.देवेंद्र फडणवीस यांनी ज्या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा मुद्दा मांडला ते श्री.सुरज जाधव

असुधारित प्रत

श्री.यशवंत माने.....

हे शेतकरी माझ्या मतदारसंघातील मगरवाडी या गावचे शेतकरी आहेत. त्यांनी मांडलेला मुद्दा बरोबर आहे की, सदर शेतकरी शेतीचे कर्ज आणि विजेच्या प्रश्नामुळे ग्रस्त होता. वास्तविक पाहता त्या दिवशी वीज तोडलेली नव्हती. परंतु वातावरण असे होते की, कर्जाला कंटाळून आणि विजेच्या प्रश्नामुळे सदर शेतकऱ्याने आत्महत्या केलेली आहे... (अडथळा...) अध्यक्ष महोदय, मी सत्य परिस्थिती सांगत आहे त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे.

अध्यक्ष महोदय, सदर शेतकऱ्याने २ तारखेला विष प्राशन केले व ४ तारखेला त्यांचा मृत्यू झाला. परंतु वस्तुस्थिती पाहता ही बाब केवळ कै.सुरज जाधव यांच्यापुरती मर्यादित नसून महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांची अवस्था अशीच झालेली आहे... (अडथळा...)

ॲड.अनिल परब : अध्यक्ष महोदय, माननीय ऊर्जा मंत्री यासंदर्भात आज सायंकाळपर्यंत निवेदन करतील.

**उपाध्यक्ष :** ठीक आहे. सरकार सायंकाळपर्यंत निवेदन करणार आहे. तसेच सदर आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबास सरकारने तात्काळ मदत करावी. आता आपण लक्षवेधी सूचना क्रमांक-१ चर्चेला घेऊ.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी. :** बीड जिल्हयातील कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नाबाबत.

**मु.शी. :** बीड जिल्हयातील कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नासंबंधी सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, सुनील राणे, राम सातपुते, अबु आजमी, मंगेश चव्हाण, योगेश सागर, रईस शेख, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री. प्रकाश सोळंके, संदिप क्षिरसागर, बाळासाहेब आजबे, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.देवेंद्र फडणवीस (विरोधी पक्षनेता) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दिवसेंदिवस बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर होत असणे, जिल्हाधिकारी कार्यालयात दिवसा गोळीबाराच्या घटनेत दोन व्यक्तींना गंभीर इजा होणे, पोलिसांचा गुन्हेगारांवर वचक राहिला नसल्याने आठवड्याभरात खुनाचे चार प्रकार उघडकीस येणे, महिला अत्याचार रोखण्यासाठी पोलिसांना मोठे अपयश आल्याने महिला विशेषतः तरुण मुलींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणे, वाळू उत्खनन आणि अवैध वाळू वाहतूक याकडे पोलिसांनी अक्षम्य दुर्लक्ष केल्याने निरपराध लोकांचे बळी जाणे, बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या वाळू उत्खनन व वाहतूक या सारख्या घटनांकडे पोलीसांकडून वरदहस्त असणे, बँका मधील आर्थिक गैरव्यवहार, देवस्थान जमीन गैरव्यवहार प्रकरणी कारवाईसाठी पोलिसांकडून होत असलेली अक्षम्य दिरंगाई, वाढलेल्या चोरी, दरोडे यांच्या घटना, यामुळे बीड जिल्ह्यातील सर्व सामान्य लोकांमध्ये पसरलेले भिती आणि दहशतीचे वातावरण, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक यांना आलेले अपयश, जिल्हा पोलिस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदली

असुधारित प्रत

श्री.देवेंद्र फडणवीस.....

प्रक्रियेत झालेला भ्रष्टाचार, यामुळे जिल्हा पोलिस दलाची प्रतिमा मलिन होणे, या गंभीर प्रकाराची दखल घेऊन शासनाने करावयाची गांभीर्यपूर्वक कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.दिलीपराव वळसे-पाटील (गृह मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(**प्रेस :** येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

**पॉइंट ऑफ ऑर्डरबाबत**

श्री.प्रकाश सोळंके : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक-१ च्या अनुषंगाने माझा पॉइंट ऑफ ऑर्डर आहे. सदर लक्षवेधी सूचना दिनांक ४ मार्च रोजीच्या कामकाज पत्रिकेमध्ये क्रमांक-१ वर दर्शविण्यात आली होती. बीड जिल्हयाशी संबंधित ही लक्षवेधी सूचना आहे. दिनांक ४ मार्च रोजीच्या कामकाज पत्रिकेमध्ये दाखविलेल्या लक्षवेधी सूचनेमध्ये सन्माननीय सदस्य श्री.संदीप क्षिरसागर, सन्माननीय सदस्य श्री.बाळासाहेब आजबे व माझे नाव होते. परंतु आज दिनांक ७ मार्च रोजीच्या कामकाज पत्रिकेमध्ये दर्शविण्यात आलेल्या या लक्षवेधी सूचनेमध्ये आमची नावे इतर सन्माननीय सदस्यांच्या खाली दर्शविण्यात आली आहेत. ही लक्षवेधी सूचना पुढे ढकललेली असल्यामुळे जशीच्या तशी आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दर्शवायला पाहिजे होती... (अडथळा...) सन्माननीय सदस्य श्री.गिरीष महाजन यांनी खाली बसून बोलू नये. आपण बोलत असताना आम्ही देखील खाली बसून बोलू शकतो.

अध्यक्ष महोदय, दिनांक ४ मार्च रोजी पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना आज जशीच्या तशी घ्यावी, असा माझा पॉइंट ऑफ ऑर्डर आहे.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

**उपाध्यक्ष :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, अगोदर या सन्माननीय सदस्यांची सूचना प्राप्त झाली होती. त्यामुळे दोन्हीकडील सन्माननीय सदस्यांची नावे एकत्रित करण्यात आली आहेत. हा विषय अतिशय महत्त्वाचा असल्यामुळे आपण सर्वांनी एकत्रितपणे चर्चा करावी.

श्री. प्रकाश सोळंके : अध्यक्ष महोदय, मला असे म्हणायचे आहे की, ही लक्षवेधी सूचना पुढे ढकललेली आहे. त्यामुळे ती जशीच्या तशी कामकाजाच्या पत्रिकेमध्ये दर्शविण्यात यायला हवी होती. त्यामध्ये इतर सन्माननीय सदस्यांची नावे का घुसविण्यात आली आहेत ? जर त्यांची नावे होती तर ४ तारखेला त्यांची नावे का समाविष्ट करण्यात आली नव्हती ?

**उपाध्यक्ष :** या लक्षवेधीमध्ये आपली नावे समाविष्ट आहेत. पण सुरुवातीला त्यांची सूचना आली होती.

श्री. जयंत पाटील (जलसंपदा मंत्री) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश सोळंके जे म्हणतात ते बरोबर आहे. आता या ठिकाणी पुढे ढकलल्यानंतर लक्षवेधी सूचनेमध्ये सुरूवातीला दुसरी नावे आली आहेत. त्यामुळे पहिल्या दिवशी ज्यांची मूळ लक्षवेधी सूचनेमध्ये नावे होती त्यांच्यापासून सुरूवात करावी.

**उपाध्यक्ष :** ठीक आहे. आपण हे तपासून घेऊ आणि चर्चा करु. आता सन्माननीय सदस्यांनी चर्चेला सुरूवात करावी.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, नियम असा आहे की, ज्यांनी लक्षवेधी आधी दाखल होते त्यांचे नाव पहिल्यांदा येते. तेथे कार्यालयाची चूक झाली ती सुधारली आहे.

**उपाध्यक्ष :** माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आता चर्चेला सुरूवात करावी.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था किती बिघडली आहे, या विषयावरील सत्तारुढ पक्षातील सदस्यांनी तळमळ आपण बघावी.

श्री. देवेंद्र फडणवीस...

अध्यक्ष महोदय, जिल्हाधिकारी कार्यालयात सत्तारुढ पक्षाचे संबंधित पदाधिकारी गोळीबार करतात. यामध्ये कौटुंबिक कारण देण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात गोळीबार होतो आणि आपण या ठिकाणी दिलेले उत्तर बघितले तर वेगळे काही सांगण्याची गरज नाही. आपण उत्तरामधून ते मान्य केले आहे.

अध्यक्ष महोदय, बीड जिल्ह्यात २०२० मध्ये ६८६ चोरीचे गुन्हे दाखल असून त्यापैकी २२८ गुन्ह उघडकीस आले आहेत. २०२१ मध्ये या ६८६ वरुन १२५६ इतक्या चोरीच्या गुन्ह्यांची वाढ झाली. त्यापैकी ३५३ गुन्हे उघडकीस आले आहेत. म्हणजे एका वर्षात दुपटीने गुन्हे वाढले आहेत. पण त्यातील ७५ टक्के गुन्हे उघडकीस आले नाहीत. एवढेच नाही तर वाळू माफियांचे अत्यंत भयानक काम तेथे सुरू आहे. वेगवेगळया प्रकारचे भयानक गुन्हे येथे घडत आहेत. आमच्या पक्षाच्या नेत्या माननीय पंकजाताई मुंडे यांनी आपल्या गृहमंत्र्यांना पत्र पाठवून विनंती केली आहे की, बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेवर एक स्वतंत्र बैठक आयोजित करावी, इतकी भयानक परिस्थिती आहे.

अध्यक्ष महोदय, या गुन्ह्यातील जे आरोपी आहेत त्यांच्याकडे या बंदुका कोठून आल्या. त्या बंदुका लायसनधारकांच्या नाहीत. तेथे मोठ्या प्रमाणात खाजगी पिस्तुल आल्या आहेत. ज्याप्रमाणे Netflix वर एक मालिका होती... मी त्या मालिकेचे नाव विसरलो. त्यामध्ये जसा पिस्तुलांचा व्यवहार होता तशीच अवस्था आपल्याला बीड जिल्ह्यामध्ये पहायला मिळते. त्यामुळे बीड जिल्ह्यात गृह विभाग कोलमडला आहे. या गोळीबाराच्या संदर्भात वरिष्ठांकडून चौकशी झाली पाहिजे. या निवेदनात जे कारण दिले आहे ते खरे कारण नाही. या प्रकरणात सत्तारुढ पक्षाचे नेते आहेत. ते जिल्हाधिकारी कार्यालयात एकमेकांवर गोळीबार करीत होते. त्यामुळे त्यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात आणि वरिष्ठांकडून या प्रकरणाची आपण चौकशी करणार आहात काय, या जिल्ह्यात वाढलेल्या गुन्ह्यांची माहिती आपण स्वत: उत्तरातून दिली असून ते गुन्हे उघडकीस येत नाहीत.

असुधारित प्रत

श्री. देवेंद्र फडणवीस...

अध्यक्ष महोदय, या व्यतिरिक्त वाळू माफियांवर आपण कोणती कारवाई करणार आहात, त्याची माहिती या सभागृहाला दिली पाहिजे.

श्री. दिलीप वळसे पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या ठिकाणी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून जो प्रश्न उपस्थित केला आहे त्या संदर्भात मी माहिती देऊ इच्छितो.

अध्यक्ष महोदय, जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये नोंदणीसंबंधी काम होते. दिनांक २५.२.२०२२ रोजी ही घटना घडली आहे. एका कुटुंबातील २ व्यक्तींची ही वडिलोपार्जित मिळकत होती.

यानंतर श्रीमती कोळगिरे...

असुधारित प्रत

श्री. दिलीप वळसे-पाटील...

त्यांच्या कुटुंबातील नातेवाईकाने ती जमीन विकण्याचा प्रयत्न केला आणि दुसऱ्या एका व्यक्तिने जाऊन ते थांबवले आणि त्यातूनच जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये रजिस्ट्रेशनच्या ठिकाणी हा गोळीबार झालेला आहे. या संदर्भात ज्यांनी गोळीबार केला आणि ज्यांनी तो थांबविण्याचा प्रयत्न केला अशा दोन्ही बाजुच्या लोकांवर गुन्हा दाखल केलेला आहे. या गुन्ह्याचा तपास सुरु आहे. जसजसा हा प्रस्ताव स्पष्ट होईल तसतशी त्या संदर्भात अधिकची कारवाई करण्यात येईल. कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले आहे तर त्याबाबत मी सांगू इच्छितो की, बीड जिल्हयातील सर्व सन्माननीय सदस्यांना बोलावून त्यांच्या बरोबर एक बैठक घेण्यात येईल.

श्री. प्रकाश सोळंके : अध्यक्ष महोदय, जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये जो गोळीबार झाला त्याबाबत माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले की, दोन्ही बाजुच्या लोकांवर गुन्हे दाखल केले आहेत. हा मुद्दा हरकत घेण्यासारखा आहे. कारण ज्यांच्यावर गोळीबार झाला, जे जखमी झाले त्यांच्या विरोधात नाही तर ज्यांनी हा गोळीबार केला त्यांच्या विरोधात कारवाई व्हायला पाहिजे होती. परंतु ती कारवाई हानून पाडण्यासाठी ज्यांच्यावर गोळीबार झाला त्यांच्यावर भारतीय दंड संहितेच्या कलम ३०७, कलम ३९५ तसेच विनयभंगाचा गुन्हा दाखल आहे. अशा प्रकारे त्या ठिकाणचे पोलिसांचे वागणे हे निश्चितपणे हरकत घेण्यासारखे आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, जे लोक जखमी झाले आहेत त्यांच्यावरील गुन्हे शासन मागे घेणार आहे काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, त्या ठिकाणची गोळीबाराची घटना ही एकमेव घटना नाही. बीड जिल्ह्यामध्ये सर्व अवैध व्यवसाय सुरु आहेत. मटका, गुटखा, दरोडे, चोऱ्या तसेच मोठ्या प्रमाणात अवैध वाळूचे उत्खनन सुरु आहे. या माध्यमातून निष्पाप नागरिकांचे बळी जात आहे. वाळू उत्खननाचा जो खड्डा केला होता त्यात चार बालकांचा मृत्यू झाला आहे. निष्पाप लोकांना ट्रकखाली, ट्रॅक्टरखाली चिरडले जात आहे. जिल्ह्यामध्ये जे वातावरण निर्माण झाले आहे त्याबाबत काही वर्तमानपत्रांची कात्रणे माझ्याकडे आहेत. एका वर्तमानपत्राची हेडलाईन अशी आहे

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. दिपक चव्हाण)**

श्री. प्रकाश सोळंके.....

की, " रोजच्या क्राईमच्या घटना बघून आम्हाला बातम्या छापायची लाज वाटत आहे." बीड जिल्ह्यातील पोलिसांचे आम्हाला काही माहीत नाही परंतु अशा प्रकारच्या प्रतिक्रिया वर्तमानपत्रातून येत आहेत. बीड जिल्ह्यात पोलीस विभागाची प्रतिमा अतिशय मलिन होत आहे. बीड जिल्ह्याचा "बिहार" झाला आहे, असे वर्तमानपत्रात छापून येत आहे. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, या सर्व घटना वाढत आहेत त्यासाठी पोलीस प्रशासनाचे प्रमुख म्हणजे पोलीस अधिक्षक हे जबाबदार आहेत. पोलीस विभागामध्ये ज्या बदल्या झाल्या आहेत त्यामध्ये देखील मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. पोलीस अधिक्षक दर महिन्याला प्रत्येक पोलीस स्टेशनमधून हफ्ता जमा करतात. माझी दुसरी मागणी आहे की, या पोलीस अधिक्षकाच्या कारभाराची वरिष्ठ अधिकाऱ्याकडून.....(अडथळा)... सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार मला जे बोलायचे आहे ते आपण बोलू द्या.

यानंतर श्रीमती करंदीकर....

श्री. प्रकाश सोळंके....

वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत या अधीक्षकांच्या कारभाराची चौकशी करणार काय तसेच या अधिकाऱ्याची बदली करुन ताबडतोब दुसऱ्या जिल्ह्यात पाठवणार काय ?

श्री. दिलीप वळसे पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश सोळंके यांनी बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था तसेच तेथे घडलेल्या घटनेबाबत भावना मांडल्या आहेत. या लक्षवेधी सूचनेला अतिशय स्पष्ट असे उत्तर देण्याचा प्रयत्न शासनाच्या वतीने केला गेला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात गोळीबार झाला. दोन्ही बाजूंवर गुन्हे दाखल झालेले आहेत. जे जखमी झाले त्यांच्यावर गुन्हे का दाखल झाले, कोणती कलमे लावण्यात आली या बाबत सन्माननीय सदस्य यांनी सांगितल्याप्रमाणे चौकशी करु. तसेच यामध्ये तथ्य नसेल तर त्यांना रिलीफ देण्याचा प्रयत्न देखील केला जाईल.

अध्यक्ष महोदय, वाळूचे उत्खनन हा संपूर्ण राज्याचा विषय आहे. राज्यात वाळू माफिया मोठया प्रमाणात काम करीत आहेत.( अडथळा ) निर्बंध आणण्याच्या बाबत....मला उत्तर देऊ द्या. बीडमध्ये आतापर्यंत ११९ कारवाया केल्या असून १४६ जणांना अटक केली आहे. इतर गुन्ह्यांच्या संबंधी उत्तरात माहिती दिली आहे. सन्माननीय सदस्य सांगतात, त्याप्रमाणे बीड जिल्ह्यात वेगवेगळया प्रकारचे गुन्हे वाढले आहेत. त्यांची चौकशी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून केली जाईल व १५ दिवसाच्या आत रिपोर्ट प्राप्त करुन योग्य ती कारवाई केली जाईल.

श्रीमती नमिता मुंदडा : अध्यक्ष महोदय, माझा मतदारसंघ बीड जिल्ह्यातीलच आहे. बीड जिल्ह्यात पोलिसांचा धाक राहिलेला नाही. बीड जिल्ह्यात डीवायएसपी, आंबेजोगाई व एस.पी चांगले काम करीत नाहीत. सर्व धाब्यांवर दारु विक्री खुलेपणाने सुरु आहे. माझ्या सोबत घडलेली घटना मी या ठिकाणी सांगू इच्छिते. साधारणपणे दोन महिन्यांपूर्वी माझे दोन वर्षांचे बाळ व माझे पती यांच्या सोबत माझ्या मतदारसंघात ऊसाचा रस पिण्याकरिता रसवंती येथे गेले होते. दुपारी ४ वाजता या रसवंतीच्या समोरच खुलेपणाने एका धाब्यावर दारु विक्री केली जात होती व तेथे

श्रीमती नमिता मुंदडा....

लोक दारु पीत होते. त्यातील ३ माणसे माझ्या जवळ आले व माझ्या सोबत फोटो काढण्याचा त्यांनी आग्रह धरला. ते बाटल्या बाहेर काढून उभे होते. ते लोक दारु प्यायलेले होते. असे असताना मी त्यांच्यासोबत फोटो कसा काढणार. यामुळे मी त्यांना सांगितले की, मी आपल्या सोबत फोटो घेऊ शकत नाही. मी माझ्या बाळासोबत येथे आले आहे. यावर त्यांनी बराच दंगा केला, आरडाओरड केली. तेथे मारामारी, चोरी अशा काही वाईट घटना घडल्या. मी आपल्याला सांगते की, या संबंधी एस.पी यांनी अद्याप मला फोन केला नाही. त्यांनी यावर काहीही केले नाही. मी त्यांना वारंवार फोन केले.

अध्यक्ष महोदय, उद्या महिला दिन आहे. मी महिला आमदार असून मला कोणतेही संरक्षण नाही. ही जी घटना माझ्या सोबत घडली त्यातील एक व्यक्ती बलात्काराच्या गुन्ह्यामधील आरोपी आहे. तो लातूरमध्ये बलात्काराच्या गुन्ह्यात आरोपी असून फरार आहे. त्याला अद्याप पकडलेले नाही.

यानंतर श्रीमती गिरप.....

श्रीमती नमिता मुंदडा ...

बीड जिल्ह्यातील पोलीस काय करीत आहेत? माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, एस.पी. बीड यांच्यावर काय कारवाई करणार आहात? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, बीड जिल्ह्यातील महिलांचे संरक्षण करण्यासाठी कुठला तरी कायदा किंवा बैठक घेण्याबाबत आपण काय करु शकता?

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नाच्या संदर्भात सभागृहात बरेच दिवस काही चर्चा झालेली नाही. आज वेगवेगळे प्रश्न वेगवेगळ्या भागातून उपस्थित केले जात आहेत. सन्माननीय सदस्यांनी जी भूमिका मांडली किंवा जो प्रश्न मांडला त्या संदर्भात मी जरुर माहिती घेईन व त्या संबंधात कठोरात कठोर कारवाई करण्यात येईल.

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, मंत्री महोदयांनी एक गोष्ट प्रामाणिकपणे मान्य केली. मी त्यांचे अभिनंदन करतो. रेती माफियांमुळे राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात त्रास वाढलेला आहे, हे त्यांनी मान्य केलेले आहे. त्यांच्या या प्रामाणिक मताचे आपण समर्थनच केले पाहिजे. राज्याचे गृह मंत्री महोदय रेती माफियाच्या विषयाबाबत सन्माननीय सदस्यांच्या मताशी सहमती दर्शवित आहेत म्हणजे महाराष्ट्रासारख्या राज्यात माफियांचा जोर वाढलेला आहे.

अध्यक्ष महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.रवी राणा असे सांगत होते की, पोलीस ट्रकमागे २० हजार रुपये घेतात. महसूल विभागाचे लोक घेतात, काय रेट आहे त्याची माहिती मला नाही, त्यांना माहिती आहे. महसूल विभाग व पोलीस विभाग या माफियांना ताकद देते काय, या सर्व गोष्टींचे केवळ उत्तर देऊन चालणार नाही. या माफियांमुळे राजकीय त्रास वाढला.

अध्यक्ष महोदय, परवा नगर पंचायतींच्या निवडणुका झाल्या. तेथे १५० मतदार असतात. माफियाच उभे राहिले व १५० लोकांना ट्रिपला घेऊन गेले व निवडून आले. सांगायचे तात्पर्य असे की, या सर्व गोष्टींबाबत माननीय श्री.दिलीप वळसे-पाटील आपल्याकडून अपेक्षा आहेत. आपला या सभागृहातील कामकाजाचा

श्री.नाना पटोले ...

तसेच महाराष्ट्रातील राजकारणाचा मोठा अनुभव आहे. तुमच्याकडून आम्हाला अपेक्षा आहेत. हे माफिया राज थांबविण्यासाठी ज्यामध्ये आमचा पोलीस विभाग सहभागी आहे, महसूल विभागही सहभागी आहे, यासाठी काय उपाययोजना करणार, त्या बाबत राज्यातील जनतेला व सभागृहाला आपण आश्वासित करावे, अशी आमची आपल्याकडून अपेक्षा आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले यांनी जी भावना मांडली आहे, त्या संदर्भात मी सभागृहाला आश्वस्त करु इच्छितो की, या संदर्भामध्ये पोलिसांना स्पष्ट सूचना दिल्या जातील आणि त्यामध्ये संबंधितांच्या विरोधात कारवाई करण्यात येईल. फक्त मला एकच सांगावयाचे आहे की, आपण नंतर कोणी त्यासाठी फोन करु नका.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, हा अतिशय गंभीर प्रकार आहे. सभागृहातील सन्माननीय आमदार श्रीमती नमिता मुंदडाताई यांनी अतिशय स्पष्टपणे ...(अडथळा)...

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण)**: माननीय गृह मंत्री यांनी बैठक घेण्याचे मान्य केले आहे. त्यामुळे आता सर्व सन्माननीय सदस्यांना आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळणार नाही.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : अध्यक्ष महोदय, ज्या ठिकाणी अवैध पध्दतीने दारु विक्री चालते त्या ठिकाणी आमदार महोदयांना त्या परिस्थितीतून जावे लागले. त्यातून पोलीस अधीक्षक देखील सर्रासपणे त्या ठिकाणी हप्ते गोळा करतात. त्यांना आमदार महोदयांची चिंता नाही मग सामान्य माणसाची काय चिंता असेल ? सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश सोळंके यांनी देखील हा मुद्दा मांडला. परंतु, येथे आमदार महोदयांना संरक्षण नाही. महिला आमदारांच्या बाबतीत जो प्रकार घडला, त्या निमित्ताने त्या पोलीस अधीक्षकांना तत्काळ निलंबित केले पाहिजे, ही आमची मागणी आहे. आमदारांना संरक्षण कोण देणार? महिला आमदार महोदयांच्या संदर्भात

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य

आपापल्या जागेवर उभे राहून घोषणा देतात.)

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील ...

असे घडले. आमदार महोदयांना संरक्षण नाही. पोलीस अधीक्षकांना निलंबित केले पाहिजे. ... (गोंधळ)...

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांनी जागेवर बसावे. मंत्री महोदयांनी सविस्तरपणे उत्तर दिले आहे व बैठक घेण्याचे मान्य केले आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसावे.

यानंतर श्री.शिंदे ....

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य हौदात येऊन एकाच वेळी बोलत असतात.)

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण)** : विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य आपल्या जागेवर बसले नाही तर मी पुढील लक्षवेधी सूचनेचे कामकाज सुरु करीन. मंत्री महोदयांनी बीड जिल्ह्याच्या कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात बैठक घेण्याचे मान्य केले आहे. मंत्री महोदय उत्तर देत आहेत.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने मी उत्तर दिले आहे. १५ दिवसांच्या आत या संदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांचा अहवाल घेऊन योग्य ती कार्यवाही केली जाईल, हे मी अगोदरच सांगितले आहे. यासंदर्भात चौकशी... निलंबित करावयाचे असले तरी... मी आपल्या भावना समजू शकतो. बीड जिल्ह्यातील सर्व सन्माननीय सदस्य यांच्या समवेत बैठक घेऊन त्यांच्या भावना समजून घेण्यात येतील. त्याप्रकरणी १५ दिवसांच्या आत अहवाल आल्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

ॲड.आशिष शेलार : अध्यक्ष महोदय, १५ दिवसांत बैठक घेण्याचे आश्वासन दिल्याबद्दल मी मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. सन्माननीय सदस्या श्रीमती नमिता मुंदडा या त्यांच्या तान्ह्या मुलासह एका ठिकाणी गेल्या असताना तेथे अनधिकृत दारु विक्री करणाऱ्या लोकांनी त्यांना घेराव घातला व फोटो काढण्याची विनंती केली होती. त्यांनी त्यास नकार दिल्यानंतर त्यांनी गोंधळ केला, हुल्लडबाजी केली. हा प्रसंग त्यांनी सांगितला आहे. या प्रसंगाच्या संदर्भात कोणतीही महिला असली तरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल होणे अपेक्षित होते. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात येईल काय ? या प्रकरणी पोलीस उप अधीक्षक यांनी सन्माननीय सदस्य यांचेशी चर्चा करण्याची अपेक्षा होती, ती त्यांनी न केल्याने त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात येईल काय ? सदरहू प्रकरणी तक्रार करुनही गुन्हा दाखल करण्यात आला नाही. या प्रकरणाच्या संदर्भात उक्त महिला सन्माननीय सदस्य यांचेशी पोलीस अधीक्षक व पोलीस उप अधीक्षक यांनी चर्चाही केली नाही. त्यांच्याविरुद्ध कोणती कारवाई करण्यात येईल ?

यानंतर श्री.तेलंग....

असुधारित प्रत

ॲड.आशिष शेलार......

पोलीस अधीक्षक आणि पोलीस उप अधीक्षक यांनी पीडित महिला आमदार महोदयांसोबत चर्चा देखील केलेली नाही. त्यामुळे आपण संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार आहात?

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** विरोधी पक्षातील सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, आता गृह मंत्री महोदय उत्तर देत आहेत. त्यामुळे आपण आपल्या जागेवर जाऊन बसावे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी जी भावना या ठिकाणी मांडलेली आहे तीच भावना यापूर्वी देखील एका सन्माननीय सदस्यांनी मांडली होती. परंतु गोंधळामुळे त्यांचे म्हणणे माझ्या लक्षात आले नव्हते. उक्त घटनेच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी तक्रारी केली आहे, परंतु गुन्हा दाखल केला नसेल तर सदरहू गुन्हा दाखल करुन घेण्याबाबत ताबडतोब सूचना देण्यात येतील. तसेच उक्त प्रकरणी ज्या पोलीस निरीक्षकांची चूक असेल त्या पोलीस निरीक्षकास ताबडतोब निलंबित देखील करण्यात येईल.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.संदिप क्षीरसागर : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेमध्ये माझे देखील नाव आहे. त्यामुळे मला बोलण्याची संधी द्यावी.

अध्यक्ष महोदय, श्री.प्रकाश सोळंके व श्रीमती नमिता मुंदडा यांनी बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीची माहिती दिलेली आहे. तशीच परिस्थिती माझ्या मतदारसंघामध्ये देखील आहे. माझ्या मतदारसंघातील कायदा व सुव्यवस्थेसंबंधी जिल्हा स्तरावरील बैठकीमध्ये अनेक वेळा तक्रारी केलेल्या आहेत. याबाबत मंत्री महोदयाकडे देखील तक्रार दिलेली आहे. तरी देखील संबंधित पोलीस अधीक्षक कोणत्याही बाबीकडे लक्ष देण्यास तयार नाहीत. माझ्या मतदारसंघामध्ये

श्री.संदिप क्षीरसागर.......

मट्टा, क्रिकेटचा सट्टा, पत्त्याचा क्लब, बेकायदेशीर सावकार, अवैध वाळुचा उपसा व वाहतूक अशा प्रकारे अनेक गैरप्रकार होत आहेत. अवैध वाळू वाहतूक विरोधात काम करीत असताना माझ्या मतदारसंघातील एका मंडळ अधिकाऱ्याचा मृत्यू झालेला आहे. तसेच माझ्या मतदारसंघामध्ये प्रथम वेश्या व्यवसाय सुरु झालेला आहे. त्यामुळे माझ्या मतदारसंघातील जनता अतिशय त्रस्त झालेली आहे. त्यामुळे माझ्या मतदारसंघातील अनेक नागरीक अशा प्रकारच्या वेगवेगळया अनेक तक्रारी माझ्याकडे करीत आहेत. बेकायदेशीर सावकारीचे प्रमाण देखील मोठ्या प्रमाणावर वाढलेले आहे.

अध्यक्ष महोदय, मी एका कर्जबाजारी कुटुंबाला माहिती विचारली असता त्यांनी मला भीत-भीत अशी माहिती दिली की, चार लाख रुपये व्याजाने घेतले असता संबंधित सावकाराने एकाच महिन्यामध्ये चार लाख रुपयांचे व्याज ३० लाख रुपये केले. त्यावर मी त्यांना सांगितले की, उक्त प्रकरणी आपण पोलीस स्टेशनमध्ये तक्रार देऊ. तेव्हा त्यांनी घाबरुन आम्हाला कोठेही तक्रारी द्यावयाची नाही, असे सांगितले. या प्रशासनाबद्दल जनतेमध्ये आदर राहिलेला नाही. कोणत्याही प्रकारची भिती देखील राहिलेली नाही.

अध्यक्ष महोदय, माझ्या मतदारसंघामध्ये मोबाईलवरुन क्रिकेटचा सट्टा लावण्याचा प्रकार मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यामुळे सर्वसामान्य लोकांच्या मानामध्ये एक भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. आमच्या घरी कोण केव्हा पैशाची वसुली करण्यासाठी येईल, हे सांगता येत नाही असे म्हणत काही जणांनी आत्महत्या देखील केलेली आहे. अशा प्रकारचे अवैध धंदे हे बाहेर देशातील लोक करीत नसून ते माझ्याच मतदारसंघातील लोक करीत आहेत. या लोकांना कोण पाठीशी घालत आहे? अशा प्रकारचे अवैधंदे करणाऱ्या लोकांवर आपण काय कारवाई करणार आहात?

अध्यक्ष महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, अशा प्रकारच्या गैरवाजवी घटनेच्या संदर्भात पोलीस अधीक्षक यांना तक्रार देऊन देखील ते याकडे अजिबात

श्री.संदिप क्षीरसागर.......

लक्ष देत नाहीत. त्यामुळे आपण उक्त प्रकरणी चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यावर काय कारवाई करणार आहात ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, या प्रश्नाचे उत्तर मी यापूर्वीच दिलेले आहे. बीड जिल्ह्यातील सर्व सन्माननीय सदस्यांसमवेत बैठक घेऊन त्यांच्या अडचणी व भावना समजून घेतल्या जातील.

श्री.कुलकर्णी.......

असुधारित प्रत

श्री. दिलीप वळसे-पाटील....

दुसरे असे की, वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत या सर्व घटनेची चौकशी करुन १५ दिवसांमध्ये अहवाल मागवून घेण्यात येईल व त्यावर आवश्यकती कार्यवाही केली जाईल. ही बाब मी यापूर्वीच सांगितलेली आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** आता लक्षवेधी सूचना क्रमांक २ घेण्यात येईल.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, आपण दुसरी लक्षवेधी सूचना केव्हा पुकारली हे आमच्या लक्षात आलेले नाही.

**तालिका सभाध्यक्ष :** मी सांगू इच्छितो की, मघाशीच ही लक्षवेधी सूचना पुकारली होती. त्यानंतर सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांना बोलण्याची संधी दिली होती. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. संदिप क्षीरसागर यांना बोलण्याची संधी दिली होती.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, ठीक आहे. आपण लक्षवेधी सूचना पुकारली आहे. त्यावर माझी हरकत नाही. मी माननीय गृह मंत्र्यांकडून एक अपेक्षा व्यक्त करतो. त्यांनी या सभागृहाचा सेन्स (कौल) लक्षात घेतला पाहिजे. अन्यथा या सभागृहाचा मान सन्मान राहणार नाही. सर्वच पक्षातील सन्माननीय सदस्य अशा प्रकारच्या तक्रारी करीत आहेत. यात सत्ता पक्षातील सदस्यांचाही समावेश आहे. त्यामुळे याबाबत माननीय गृह मंत्र्यांकडून १५ दिवसात बैठक घेतली जाईल, असे उत्तर अपेक्षित नाही. त्यांनी तात्काळ कार्यवाही केली पाहिजे, अशी अपेक्षा त्यांच्याकडून व्यक्त करतो. त्यांनी याबाबत नंतर आवश्य बैठक घ्यावी. परंतु आता सभागृह सुरु असताना काहीतरी कडक कारवाई करावी, अशी त्यांच्याकडून अपेक्षा व्यक्त करतो. याबाबत त्यांनी घोषणा करावी, अशी मी विनंती करतो.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, ठीक आहे. पोलीस अधीक्षकांना रजेवर पाठविण्यात येईल. दरम्यानच्या काळात चौकशी करण्यात येईल व त्यानंतर आवश्यकती कार्यवाही केली जाईल.

-------

**तालिका सभाध्यक्ष :** आता पुढील लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येईल.

असुधारित प्रत

**पृ.शी. :** राज्यातील शेतकऱ्यांचे कृषि पंप व घरगुती वीज जोडणी कापल्याबाबत

**मु.शी. :** राज्यातील शेतकऱ्यांचे कृषि पंप व घरगुती वीज जोडणी कापल्याबाबत सर्वश्री. कुणाल पाटील, नानाभाऊ पटोले, सुरेश वरपुडकर, पृथ्वीराज चव्हाण, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. सुभाष धोटे, अमित झनक, अमीन पटेल, जितेश अंतापूरकर, हिरामण खोसकर, संग्राम थोपटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. विकास ठाकरे, देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. राम कदम, रवि राणा, अभिमन्यु पवार, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री. किसन कथोरे, गणपत गायकवाड, संजय केळकर, कुमार आयलानी, राम सातपुते, अतुल भातखळकर, गणेश नाईक, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री. नामदेव ससाने, मोहनराव हंबर्डे, संजयमामा शिंदे, समिर मेघे, मोहन मते, डॉ. पंकज भोयर, श्री. कैलास घाडगे पाटील, डॉ. देवराव होळी, कुमारी प्रणिती शिंदे, सर्वश्री. किशोर जोरगेवार, प्रशांत बंब, राजेश पवार, श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, सर्वश्री. मंगेश चव्हाण, दिलीपराव बनकर, अबू आजमी, रईस शेख, सुरेश भोळे, संजय सावकारे, गिरीष महाजन, अनिल बाबर, श्रीमती श्वेता महाले, ॲड राहूल कुल, श्री. जयकुमार गोरे, वि.स.स.

असुधारित प्रत

श्री. कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, "शेतकऱ्यांचे कृषी पंप व घरगुती वीज जोडणी कोणतीही पूर्वसूचना न देता कापत असल्याची बाब नुकतीच निदर्शनास येणे, परिणामी शेतकऱ्यांनी कर्ज काढून रब्बी हंगामातील केलेली पेरणी पाण्याअभावी वाया जाणे, रोहित्र जळाल्यास त्या रोहित्रावर जेवढ्या वीज जोडणी असतील त्यांना सक्तीने बिले भरण्यास सांगणे, बिल न भरल्यास रोहित्र दुरुस्ती करून न देणे, परिणामी शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होऊन ते कर्जबाजारी होणे, शासनाने शेतकऱ्यांच्या वीज जोडण्या तोडणार नाही अशी घोषणा करुनही वीज जोडण्या मोठ्या प्रमाणात तोडणीचे काम सुरुच ठेवणे, पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन तसेच पथदिव्यांच्या जोडण्या तोडल्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात होत असलेली गैरसोय, जोपर्यंत पूर्ण थकीत वीजबिल भरले जात नाही तोपर्यंत वीज पुरवठा खंडीत ठेवणे, प्रस्तुत प्रकरणाकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

श्री. प्राजक्त तनपुरे (ऊर्जा राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत

श्री. कुणाल पाटील : अध्यक्ष महोदय, ऊर्जा विभागाच्या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर लक्ष वेधण्याचा मी यानिमित्ताने प्रयत्न करीत आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या विजेचा हा प्रश्न आहे. हा विषय अतिशय महत्त्वाचा आणि शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा आहे. ग्रामीण भागातील शेतकरी त्रस्त झाला आहे. रब्बीचे हातात आलेले पीक विजेमुळे हातातून जाते किंवा काय, अशी स्थिती सध्या आहे. थोड्याच वेळापूर्वी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी शेतकऱ्यांची आत्महत्या झाल्याचा विषय मांडला होता. पुढील काळात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढले तर त्यात विजेच्या समस्यांमुळे आत्महत्या झाल्याची शक्यता नाकारता येणार नाही. पुढील काळात विजेमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतील. हातामध्ये आलेले पीक आज हिरावून घेतले जात आहे. खरिपाच्या हंगामामध्ये महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली होती. प्रत्येक शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागले होते. शेतकऱ्यांनी सावरत रब्बी हंगामातून हे नुकसान भरुन काढण्यासाठी प्रयत्न केले. असे प्रयत्न करीत असताना शासनाचे अधिकारी शेतकऱ्यांची वीज कापत आहेत. त्यामुळे नजरेला दिसणारे पाणी आपण आपल्या शेतामध्ये आणू शकत नाही, अशी भावना त्यांच्या मनामध्ये निर्माण होत आहे. आता उन्हाचे प्रमाण वाढले आहे. अशात शेतातील पिके जळत आहेत. यामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यातून अश्रू येत आहे. अशी सर्वत्र परिस्थिती दिसून येत आहे. मागील अधिवेशनामध्येही हा प्रश्न उपस्थित केला होता. तेव्हा माननीय अर्थमंत्री महोदयांनी शेतकऱ्यांची वीज कापली जाणार नाही, असे आश्वासन दिले होते. असे असताना आजही शेतकऱ्यांची वीज तोडली जात आहे. मला वाटते की, हे या राज्यातील शेतकऱ्यांचे दुर्दैव आहे. त्यामुळे मी माननीय ऊर्जा मंत्र्यांना स्पेसिफिक प्रश्न विचारणार आहे. शेतकऱ्यांना कोणतीही नोटीस न देता वीज तोडली जाते. तसेच काही शेतकऱ्यांनी मागील काळात विजेचे काही पैसे भरलेले असतानाही वीज कापली जात असेल तर ते तात्काळ थांबविण्याचे आदेश मंत्री महोदय देणार आहेत काय ? दुसरे असे की, विलासराव देशमुख अभय योजना राज्य सरकारने अंमलात आणली आहे. मागील अनेक वर्षापासून शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन न कापता त्यांच्या विजेच्या बिलाची वसुली केली गेली नाही. मागील पाच वर्षे भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेत होते. तेव्हा वीज वसुली केली नाही. त्यापूर्वीच्या काळात

श्री. कुणाल पाटील .....

काँग्रेस, राष्ट्रवादी-काँग्रेस पक्षाचे सरकार सत्तेत होते. तेव्हाही वीज वसुली केली नाही. असे असताना अचानकपणे ही वीज वसुली केली जात आहे.

यानंतर श्री.चौधरी...

असुधारित प्रत

श्री.कुणाल पाटील.....

विलासराव देशमुख यांच्या नावाने अभय योजना आणल्याची बातमी सोशल मिडियावर फिरत आहे. सरकारने अशी योजना आणून एक चांगला पायंडा पाडला आहे त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. परंतु ९ हजार ३५४ कोटींच्या थकबाकी संदर्भात सरकार सांगत आहे की, आपण तात्काळ वीज बिल भरा आम्ही व्याजामध्ये सूट देऊ. मुद्दा असा आहे की, गेल्या वीस-पंचवीस वर्षांची थकबाकी एका वर्षामध्ये वसूल केली जाऊ शकत नाही. आपण शेतकऱ्यांना जर असे म्हणत असाल की, जर १०० रुपये थकबाकी असेल तर ती आजच्या आज भरावी तर ते भरु शकत नाहीत. त्यामुळे पुढील किती वर्षांमध्ये आपण थकीत वीज बिल वसुलीचे नियोजन करीत आहात ती बाब सभागृहाला सांगावी.

अध्यक्ष महोदय, एका डी.पी. वर ५० कनेक्शन्स् असतील व त्यापैकी १० शेतकऱ्यांनी वीज बिल भरले नसेल तर उर्वरित ४० लोकांची कनेक्शन्स् देखील तोडली जातात. गेल्या अधिवेशनामध्ये माननीय ऊर्जा मंत्री म्हणाले होते की, "सरसकट सर्वांची कनेक्शन्स् न तोडता ज्यांनी वीज बिल भरले नसेल त्यांचेच कनेक्शन्स् कट करु." त्यासंदर्भात सरकारने काही नियोजन केले आहे का हा देखील माझा या निमित्ताने प्रश्न आहे.

श्री.प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन-तीन प्रश्न विचारले आहेत. राज्यातील शेतकऱ्यांना देखील हा प्रश्न पडला आहे. यासंदर्भात मला सविस्तर बोलण्याची परवानगी द्यावी, ही विनंती...(अडथळा...)

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारले की, समजा १०० रुपये थकबाकी असेल तर शेतकरी एकाच वर्षात सर्व थकबाकी कसे भरु शकतील ? हा मुद्दा अतिशय योग्य आहे. यासंदर्भात आणलेल्या योजनेनुसार मागील सर्व थकबाकी आताच भरावी असे आपले म्हणणे नाही. कृषी वीज धोरण-२०२० मध्ये आपण सांगितले आहे की, सन २०१५ पूर्वीचा दंड आणि व्याज माफ करण्यात आले आहे. तसेच सन २०१५ च्या नंतरचे व्याज हे महावितरणने ज्या दराने पैसे घेतले असतील त्याच दराने द्यायचे आहेत.

श्री.प्राजक्त तनपुरे.....

त्यापेक्षा जास्तीचे व्याज आकारलेले कमी करण्यात आले आहे. हे सर्व वजा केल्यानंतर शेतकऱ्याने १०० पैकी ५० रुपये भरले तर ५० रुपये माफ करण्यात येतील. याचा सारांश सांगायचा झाला तर सरकारने असे कुठेही म्हटलेले नाही की, १०० रुपये थकबाकी असेल तर ती सर्वच्या सर्व भरावी. मी मघाशी दिलेली आकडेवारी आपण पाहिली तर असे दिसून येईल की, सुमारे ६० ते ७० टक्के रक्कम आपण माफ केली आहे. काही प्रकरणांमध्ये तर हे प्रमाण अधिक आहे. उर्वरित २५ ते ३० टक्के रक्कम जानेवारी, २०२१ ते मार्च, २०२२ पर्यंत टप्प्याटप्प्याने भरण्याचा उल्लेख योजनेमध्ये होता. मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, मागील सर्व थकबाकी लगेच भरावी असे सरकारने कुठेही म्हटलेले नाही... (अडथळा...) सर्व सन्माननीय सदस्यांचे बोलून झाल्यानंतर मी या विषयावर सविस्तर देखील उत्तर देऊ शकतो.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी मंत्री महोदयांना अतिशय सरळ प्रश्न विचारलेले आहेत. मागील अधिवेशनामध्ये राज्याचे उप मुख्यमंत्री माननीय श्री.अजित पवार यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, चालु वीज बिल भरले तरीही आम्ही कनेक्शन्स् तोडणार नाहीत. माझा या निमित्ताने असा प्रश्न आहे की, या सभागृहाला काही santity आहे की नाही ? या सभागृहामध्ये माननीय उप मुख्यमंत्र्यांनी एखादी घोषणा केली असेल तर तिला काही महत्त्व आहे किंवा कसे ? अधिवेशन संपल्यानंतर तात्काळ सरसकट सर्वांचे वीज कनेक्शन्स् कापणे सुरु करण्यात आले. एखाद्या डी.पी. वरील ८ शेतकऱ्यांनी पैसे भरले असतील व २ शेतकऱ्यांनी भरले नसतील तरीही डी.पी. काढून नेली जाते. त्यामुळे गावच्या-गावे अडचणीत आली आहेत. त्यामुळे मंत्री महोदयांना पहिला प्रश्न असा आहे की, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी सभागृहामध्ये दिलेले आश्वासन हे सरकार पाळणार आहे का ? जर पाळणार असेल तर आजपासूनच कनेक्शन्स् तोडणे बंद करावे. तसेच आश्वासनाप्रमाणे तात्काळ शासन निर्णय निर्गमित केला जाईल का?

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, आपले जे कृषी धोरण आले, त्याच्या मागची जी थकबाकी होती त्याला आपण... (अडथळा)....

**तालिका सभाध्यक्ष (श्री. दीपक चव्हाण)** : सर्व सन्माननीय सदस्यांनी ऐकून घ्यावे.

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, आपण मागच्या वर्षी नवीन धोरण आणले. त्याच्या अगोदरची थकबाकी होती. त्यानंतर महावितरणने चालू बिलामध्ये... वर्षभराचे चालू बिल कन्शीडर करुन आपण ते कन्शीडर करतो. त्यामध्ये मागचे बिल घेतलेले नाही. जसे मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांनी सांगितले त्याप्रमाणेच हे सुरू आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे भाषण पूर्ण होऊ द्यावे.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, माझा पॉईन्ट ऑफ ऑर्डर आहे. मंत्री महोदय अतिशय सुंदरपणे दिशाभूल करीत आहेत. ते म्हणतात की, सर्व होऊन जे चालू बिलामध्ये येते तेच चालू बिल आहे. असे चालू बिल मान्य नाही. त्यामध्ये असे म्हटलेले नाही. ३ महिन्याचे जे एक चालू बिल आहे ते भरले तरी देखील आम्ही वीज कनेक्शन कट करणार नाही, असे आश्वासन या सभागृहात दिले आहे. आपण त्या बिलाला व्याज लावता आणि त्याला चालू बिल म्हणता. हा चालूपणा आहे. हे चालू बिल नाही. असा चालूपणा करु नका. शेतकऱ्याच्या विरोधा अशा प्रकारे जाऊ नका. एक सूरज जाधव आज आत्महत्या करीत आहे. पण रोज असे सूरज जाधव तयार होतील. या सभागृहाच्या पटलावर उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी आश्वासन दिलेले आहे. जर ते पाळले गेले नाही तर आम्ही उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्याविरुध्द हक्कभंग प्रस्ताव मांडू. कारण हे पवित्र सभागृह आहे आणि या सभागृहामध्ये दिलेले आश्वासन पाळण्याची जबाबदारी सरकारची आहे. त्यामुळे

श्री. देवेंद्र फडणवीस...

आम्हाला स्पेसिफिक माहिती पाहिजे की, या ठिकाणी उपमुख्यमंत्री दिलेल्या आश्वासनाचा चालूपणा न करता थेट जीआर काढणार आहात काय ?

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, मी माननीय विरोधी पक्षनेत्यांचा आदर करतो. त्यांच्या म्हणण्यानुसार जीआर काढण्याचा विचार करावा लागणार असेल तर मला यासंबंधी थोडे खोलात जाऊन माहिती दिली पाहिजे. कारण मी अत्यंत तुटपूंज्या वेळात उत्तर देऊ शकणार नाही. आपली परवानगी असेल तर मी संपूर्ण महाराष्ट्राला अवगत होण्यासाठी सर्व बाबी सांगणार आहे.

अध्यक्ष महोदय, यासंबंधी जीआर काढायचा असेल तर... आता संपूर्ण राज्य हे कामकाज पाहते आहे. राज्यातील शेतकऱ्यांचा हा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यामुळे आपली परवानगी असेल तर मी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जे सांगितले त्यावर जास्त खोलात जाऊन व्यवस्थित माहिती सांगितली तर त्या कारणाप्रत आपण कसे आलो आहोत हे लक्षात येईल. म्हणून मला आपण थोडा जास्त वेळ दिला तर मी निश्चितपणे सांगतो.

श्री. नाना पटोले : अध्यक्ष महोदय, एका महत्वपूर्ण लक्षवेधी सूचनेवर या ठिकाणी चर्चा सुरू आहे. शेतकऱ्यांच्या कृषी पंपाचे वीज कनेक्शन कापल्यामुळे जो प्रश्न निर्माण झाला आहे आणि त्यामधून शेतकऱ्यांनी आत्महत्त्या होत आहेत, हे मी मान्य करतो. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन तोडणे आपण बंद करणार आहात काय, दुसरे म्हणजे रात्री १२ ते सकाळी ६ वाजेपर्यंत शासन जो कृषी पंपांसाठी वीज पुरवठा करते त्याऐवजी आपण शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करणार आहात काय, आपण या २ प्रश्नांचे उत्तर दिले तरी आम्ही समाधानी होऊ. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करणे आणि शेती पंपांचे वीज कनेक्शन कापले जाणार नाहीत असे आश्वासन दिले तरी हा प्रश्न सुटेल.

असुधारित प्रत

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांची भावना अतिशय तीव्र आणि तळमळीची आहे. महाविकास आघाडीचे सरकार हे शेतकऱ्यांची भावाना समजून काम करणारे हे सरकार आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

अध्यक्ष महोदय, आपण माझे बोलणे पूर्ण करण्याची संधी द्यावी. सन्माननीय सदस्य श्री. नाना पटोले यांनी वीज कनेक्शन्स कट करणार आहात काय याबद्दल विचारणा केली आहे. मला त्यांच्या प्रश्नाला उत्तर द्यायचे आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी आधी मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घ्यावे.

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, वास्तविक पाहता आपण जर बघितले तर... आमच्यापैकी कोणालाही असे वाटत नाही की, शेतकऱ्यांच्या कृषी पंपाचे वीज कनेक्शन तोडावे.

यानंतर श्रीमती कोळगिरे...

असुधारित प्रत

श्री. प्राजक्त तनपुरे....

अशी आमची किंवा अधिकाऱ्यांची इच्छा नाही. दुर्दैवाने महावितरणची आर्थिक परिस्थिती सुद्धा आपण समोर आणली पाहिजे. (अडथळा).....अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी ऐकण्याची तयारी ठेवली पाहिजे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभाध्यक्ष (श्री. दिपक चव्हाण)** : आपण माननीय मंत्र्यांना उत्तराची संधी दिली पाहिजे.

श्री. प्राजक्त तनपुरे : अध्यक्ष महोदय, सभागृहातील वातावरण हे लोकशाहीला शोभणारे नसुन लोकशाहीचा गळा घोटणारे वातावरण आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : माननीय विरोधी पक्ष नेते आपण माननीय मंत्र्यांचे उत्तर ऐकून घ्या. त्यानंतर आपले समाधान झाले नाही तर....

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर असा आहे की, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सर्व विचार करुन, सर्व आर्थिक परिस्थिती पाहून हा निर्णय सभागृहात जाहीर केलेला आहे. तो निर्णय आता आपण बदलणार आहात काय ? असे असेल तर आपण तो निर्णय बदलला आहे असे सांगा किंवा माननीय उप मुख्यमंत्र्यानी दिलेले आश्वासन सरकार पाळणार नाही, असे आपण सांगा. त्यांनी खोलात जाऊनच हा निर्णय घेतलेला होता. माननीय उप मुख्यमंत्री विषयाच्या खोलात गेले नव्हते काय, त्यांना समजत नाही किंवा त्यांनी काही पाहिले नाही काय? अध्यक्ष महोदय, ही सर्व दिशाभूल सुरु आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : आपण माननीय मंत्र्यांचे उत्तर तरी ऐकून घेतले पाहिजे.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री उत्तर फिरवत आहेत. आमचा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.देवेंद्र फडणवीस....

यांनी जे आश्वासन दिले होते त्याची पुर्तता होणार आहे किंवा नाही आणि वीज कनेक्शन कापणे तात्काळ बंद होणार आहे किंवा नाही ? सन्माननीय सदस्य श्री. नाना पटोले तसेच इतर सर्व सन्माननीय सदस्यांनी देखील तीच मागणी केली आहे. त्यामुळे वीज कनेक्शन कापणे बंद होणार की नाही या एका स्पेसिफिक प्रश्नाचे उत्तर आम्हाला पाहिजे आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : माननीय मंत्री उत्तर देणार आहेत त्यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसावे.

डॉ. नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नाना पटोले यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्या अनुषंगाने आणि राज्याचे माननीय माजी मुख्यमंत्री व विरोधी पक्ष नेते श्री. देवेंद्र फडणवीस यांनी मुद्दा उपस्थित केला आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी करंट बिल भरलेले असेल तर विजेचे कनेक्शन कापले जाणार नाही,असे सांगितले होते. हे सत्य आहे. त्यामुळे आम्ही कनेक्शन कापत नाही. आता थकबाकीचा प्रश्न उरला आहे. त्याबाबत आमच्या अशा सूचना आहेत की, संबंधितांनी याचे हफ्ते पाडून देण्यासाठी तक्रार करायची, त्यानंतर आम्ही थकबाकीचे हफ्ते पाडून घेतो आणि करंट बिलावर कनेक्शन सुरु ठेवतो.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, आपण मला सोडून सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना विचारा की, माननीय मंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे घडत आहे काय ? अध्यक्ष महोदय, चालू बिलामध्येच चालूगिरी चालत आहे. आम्ही स्पेसिफिक मागणी केली होती की,तीन महिन्याचे बिल करंट बिल मानायचे आणि ते भरल्यानंतर आपण वीज कनेक्शन कापणार नाही, असे आश्वासन दिले आहे. आता आपण सरसकट वीज कनेक्शन कापत आहात. माननीय उप मुख्यमंत्र्यानी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. आपल्याला समर्थन

श्री. देवेंद्र फडणवीस....

देणारे श्री.राजु शेट्टी यांनी वीज मंडळाचे कार्यालय जाळले आहे. हे जाळणे योग्य नाही आणि मी त्याचे समर्थनही करीत नाही.

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहतात)

श्री.देवेंद्र फडणवीस....

आपण सांगता तेवढे सोपे असते तर माननीय श्री. राजू शेट्टी यांनी कार्यालय कशाला जाळले असते ? कोणी तरी साप सोडत आहे. त्याचे मी समर्थन करणार नाही. माननीय ऊर्जा मंत्री आपण हे लक्षात घ्या. परिस्थिती वाईट असेल. वीज मंडळ कधीच असे नफ्यात नव्हते. वीज मंडळ चालू नफ्यात असते बाकी ते नेहमी तोट्यातच असते. मात्र तरी देखील शेतकऱ्यांच्या संदर्भात सरकार नेहमी संवेदनशील असते. गेले ७-८ वर्षे शेतकऱ्यांची वाईट गेली आहेत. कधी अतिवृष्टी तर कधी अवर्षणाचा सामना शेतकऱ्यांना करावा लागला आहे. आता पुन्हा २-३ वर्षे अतिवृष्टी होत आहे. ३६५ दिवस पाऊस पडत आहे. आपल्या जिल्ह्यातही पाऊस पडत आहे. यामुळे आपण वकिलांचे उत्तर देऊ नका. आपण डॉक्टर आहात. डॉक्टरेटचे उत्तरही देऊ नका. आम्हाला आपल्याकडून स्पेसिफिक उत्तर पाहिजे. माननीय मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी घोषणा केली होती, त्याप्रमाणे तत्काळ विजेचे कनेक्शन कापणे बंद करणार काय ?

डॉ. नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, मी या ठिकाणी पूर्वीच असे सांगितले आहे की, माननीय श्री. अजित पवार हे राज्याचे उप मुख्यमंत्री आहेत, महाविकास आघाडी सरकारचे नेते आहेत. त्यांनी सदनाला सांगितले की, करंट बिल भरल्यानंतर आम्ही वीज कनेक्शन सुरु ठेवू. त्या अनुषंगाने आम्ही ते मानले तसेच सूचना देखील दिल्या आहेत. बिलाच्या थकबाकीचा प्रश्न राहिला आहे. या बाबत शेतकऱ्यांनी जर लेखी स्वरुपात हप्ते मागितले तर त्यांना हप्ते देण्याची कार्यवाही केली जाते. आम्ही ते करीत आहोत.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, हे जे करंट बिल सांगत आहेत ते १८ महिन्यांचे बिल आहे. ज्या दिवशी थकबाकी सुरु झाली त्या दिवशी पासूनचे बिल करंट केले आहे. त्यामुळे १८ महिन्याचे बिल करंट म्हटले आहे. मी बिल पाहिले आहे. मी आपल्याला बिल दाखवतो. हे करंट बिल १८ महिन्यांचे असून ते व्याजासह

श्री. देवेंद्र फडणवीस .....

आहे. हे बिल भरता येणार नाही. शेतकरी बिल का भरणार नाहीत ? त्याचे जर उभे पीक जळत असेल व त्याला ५०० ते ७०० रुपये भरायचे असतील तर ते बिल शेतकरी भरणार नाहीत काय ? २५ ते ५० हजार रुपयांचे बिल आहे. आपण जे करंट बिल म्हणत आहात, तसे ते नाही. या करंट बिलामध्ये, चालू बिलामध्ये चालूपणा झाला आहे. आपण थेट ३ महिन्यांचा जो वापर असेल त्याचे बिल घ्या. वीज जोडण्या परत जोडा व या वीज जोडण्या तोडण्याचे बंद करा, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

डॉ. नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, आता या ठिकाणी खरी बाब निदर्शनास आणावी लागेल. विरोधी पक्ष नेते यांनी या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला आहे. पहिली बाब अशी आहे की, जे करंट बिल ११ महिन्यांचे पाठवले जात आहे, ते तसे नाही. करंट बिल ३ महिन्यांचे असते. यामध्ये थकबाकीची रक्कम वेगळी दाखवलेली असते.

**तालिका सभाध्यक्ष ( श्री. दीपक चव्हाण ) :** विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी आपल्या जागेवर बसावे.

डॉ. नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, येथे कोणी साप सोडलेला नाही. आपण जागेवर जाऊन बसावे व ऐकावे. विरोधी पक्ष नेते व माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील, आपला सन्मान आहे. काही हरकत नाही. एक गोष्ट आपण लक्षात घ्या. करंट बिल हे ३ महिन्यांचेच असते. मी आपल्याला सांगू इच्छितो की,कृषी वीज जोडणी धोरणांतर्गत (अडथळा) ....

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य घोषणा देतात. )

**तालिका सभाध्यक्ष :** विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी आपल्या जागेवर बसावे.

असुधारित प्रत

डॉ. नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, निषेध करण्यापूर्वी परिस्थिती काय आहे हे समजून घेतले पाहिजे. सन २०१४-१५ मध्ये थकबाकी ११ हजार ५६२ कोटी रुपये होती ती सन २०१९-२० मध्ये ४० हजार २९१ कोटी रुपयांपर्यंत कशी गेली ? आपल्या कार्यकाळात ही थकबाकी वाढली आहे. आम्ही नवीन वीज जोडणी धोरण काढून ५० टक्के निर्लेखन केले. १० हजार ४२० कोटी रुपयांची थकबाकी निर्लेखित केली आहे, हे आपण स्वीकारले पाहिजे.

**तालिका सभाध्यक्ष :** विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी आपल्या जागेवर बसावे. अशी कामकाजाची पद्धत नाही.

यानंतर श्रीमती गिरप.....

असुधारित प्रत

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकत्रितरित्या घोषणा देत असतात.)

डॉ.नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, विजेचा विलंब आकार व व्याज दर यामध्ये सुध्दा सूट दिलेली आहे. असे नाही की, आम्ही काही केलेले नाही. आपल्या नेत्यांना ही सर्व बाब माहिती आहे. मला एक सांगा की, या देशामध्ये जेव्हा लॉकडाऊन होता त्या लॉकडाऊनच्या काळात २४ तास वीज वापरली जात होती. आम्ही कुठेही वीज थांबवली नाही. २४ तास वीज दिली. चक्रीवादळ असो, महापूर असो, तेव्हा देखील विजेचा पुरवठा केला. आम्ही कुठेही लोडशेडिंग होऊ दिले नाही, कोळशाचे शॉर्टेज आले तरी होऊ दिले नाही. हे सर्व करीत असताना ज्या चांगल्या गोष्टी घडल्या त्याबद्दल आपण बोलतच नाही. जे पाप तुम्ही करुन ठेवले, त्या पापाचे निर्लेखन करण्यासंबंधी एक चकार शब्द तुम्ही काढत नाही.

..........

असुधारित प्रत

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकत्रितरित्या घोषणा देतच असतात.)

**पृ. शी. :** ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सुविधा भूखंड व आरक्षित भूखंड ज्या विकासकाने महानगरपालिकेला हस्तांतरित केले त्याच विकासकाला रेडीरेकनरच्या दरानुसार १२५ टक्के रक्कम आकारून बांधकाम करायला देण्याचा महानगरपालिकेने ठराव

**मु. शी. :** ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सुविधा भूखंड व आरक्षित भूखंड ज्या विकासकाने महानगरपालिकेला हस्तांतरित केले त्याच विकासकाला रेडीरेकनरच्या दरानुसार १२५ टक्के रक्कम आकारून बांधकाम करायला देण्याचा महानगरपालिकेने ठराव, या संबंधी श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. प्रताप सरनाईक (ओवळा-माजिवडा) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स. नियम १०५ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सुविधा भूखंड व आरक्षित भूखंड ज्या विकासकाने महानगरपालिकेला हस्तांतरित केले त्याच विकासकाला रेडीरेकनरच्या दरानुसार १२५ टक्के रक्कम आकारून बांधकाम करायला देण्याचा महानगरपालिकेने ठराव क्रमांक. १४३४ दिनांक १२ नोव्हेंबर, २०१७ आणि त्या

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकत्रितरित्या घोषणा देतच असतात.)

श्री.प्रताप सरनाईक ....

अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेचे परिपत्रक क्रमांक ठामपा/शाविवि/वियोअंक-६७, दिनांक ७ एप्रिल, २०१८ अनुसार पारित करण्यात येणे, तत्कालीन व विद्यमान आयुक्तांनी काही मोजक्या विकासकांना अधिकृतरित्या प्रमाणपत्र देऊन बांधकाम परवानगी दिलेली असणे, सदर विकासकांचे जागेवर काम चालू असून तेथील व्यापारी गाळे व सदनिका सर्वसामान्य जनतेला विकणे, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी याबाबत महानगरपालिकेकडे चौकशी करणे, नगरविकास विभागाची परवानगी न घेता दोन्ही आयुक्तांच्या कार्यकाळात विकासकांना सीसी प्रमाणपत्र देण्यात येणे, शासनाच्या नियमावलीमध्ये त्याचा कुठेही उल्लेख नसल्याने सदर होत असलेली बांधकामे पूर्णपणे बेकायदेशीर असून त्यांना ओ.सी. देण्यात येणार नसल्याचे सांगण्यात येणे, ज्या ग्राहकांनी या प्रकल्पामध्ये व्यापारी गाळे अथवा सदनिका घेतल्या आहेत त्यांचे भविष्य अंध:कारमय असणे, सदर बांधकामे तातडीने थांबवून ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या विकासकांवर गुन्हे दाखल करुन ग्राहकांना पैसे परत करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.एकनाथ शिंदे (नगरविकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..............

असुधारित प्रत

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकत्रितरित्या घोषणा देतच असतात.)

श्री.प्रताप सरनाईक : अध्यक्ष महोदय, ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये दोन वर्षांपूर्वी काही आरक्षित व सुविधा भूखंडांच्या बाबतीत एक वेगळा निर्णय घेण्यात आला. त्यावेळेस ठाणे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट असल्या कारणामुळे तत्कालीन आयुक्तांनी ए.आर. पॉलिसी असतानासुध्दा जे सुविधा भूखंड आहेत, त्या सुविधा भूखंडांचा काही भाग १२५ टक्के रेडीरेकनरचा दर आकारुन विकासकाला देऊन त्या माध्यमातून ते सुविधा भूखंड विकसित करण्याचे धोरण आखले होते.

अध्यक्ष महोदय, ८ विकासकांना त्यावेळेस परवानगी दिली होती. परंतु, त्यानंतर अन्य विकासकांना मात्र नवीन आलेल्या आयुक्तांनी परवानगी नाकारली. खरे तर ज्या विकासकांना परवानगी देण्यात आली होती. त्या विकासकांनी सी.सी. घेतले. महानगरपालिकेकडे सुमारे ७० ते ७५ कोटी रुपये भरले. त्यानंतर त्यांनी कामही सुरु केले. परंतु, नवीन आलेल्या महानगरपालिकेच्या आयुक्तांना ज्या वेळेस काही ... (अडथळा)...

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसावे. मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. आपण ऐकत नसाल तर यावर उपाय काय? आपण ऐकून घेतले पाहिजे. आपण ऐकून घेत नाही. ... (अडथळा)...

श्री.प्रताप सरनाईक : अध्यक्ष महोदय, त्यावेळेस महापालिकेच्या वतीने त्यांना परवानगी देण्यात आली ... (अडथळा)... एका महानगरपालिकेमध्ये एक आयुक्त एक निर्णय घेतात व दुसरे आलेले आयुक्त जर नवीन निर्णय घेत असतील तर सर्वसामान्य नागरिकांनी काय करावे, हा प्रश्न निर्माण झालेला असल्याने मी ही लक्षवेधी सूचना मांडलेली आहे.

अध्यक्ष महोदय, माझी शासनाला व प्रामुख्याने नगरविकास विभागाला एक विनंती आहे की, जे पूर्वीचे ८ प्रपोजल सँक्शन झाले व ज्यांना सीसी दिलेले आहे त्यांना ओसीच मिळणार नसेल तर ती बांधकामे अनधिकृत ठरतात. त्यामुळे ती

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकत्रितरित्या घोषणा देतच असतात.)

श्री.प्रताप सरनाईक ....

बांधकामे थांबवून जोपर्यंत नगरविकास खात्याचा निर्णय होत नाही आणि शासनस्तरावर त्याला परवानगी दिली जात नाही, तोपर्यंत याला स्थगिती द्यावी किंवा अन्य ज्या विकासकांनी तशाच पध्दतीचे प्रपोजल ठाणे महानगरपालिकेकडे पाठविले आहे, त्या विकासकांनासुध्दा त्या पध्दतीने परवानगी द्यावी.

अध्यक्ष महोदय, मी आपल्या माध्यमातून माननीय नगरविकास मंत्री महोदयांना हे विचारु इच्छितो की, या सर्व प्रकरणाची चौकशी करणार काय व चौकशी करुन जी विकास कामे सुरु आहेत, त्यांना जी परवानगी दिली आहे, ती रद्द करणार काय? जर ती परवानगी रद्द केली नाही तर भविष्यामध्ये अन्य विकासकांनासुध्दा तशी परवानगी देणार काय? ... (अडथळा) ...

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांना मी विनंती करतो की, आपण जागेवर बसावे.

श्री.एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रताप सरनाईक यांनी या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून ठाणे महामहानगरपालिका क्षेत्रातील सुविधा व आरक्षित भूखंड ज्या विकासकाने महानगरपालिकेला हस्तांतरित केले, त्याच विकासकाला रेडीरेकनरच्या दरानुसार १२५ टक्के रक्कम आकारुन बांधकाम करायला देण्याच्या महानगरपालिकेच्या ठराव क्रमांक १४३४ बाबत मुद्दे उपस्थित केलेले आहेत. यामध्ये जे ८ प्रकल्प आहेत ... (अडथळा) ...

नंतर श्री.शिंदे ...

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य हौदात येऊन एकत्रितरित्या घोषणा देत असतात.)

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दीपक चव्हाण) :** सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी १.३५ ते १.४५ वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.दीपक चव्हाण)**

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आता सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित नाहीत. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला विषय अतिशय महत्त्वाचा आहे. त्यामुळे यासंदर्भात मी सूचना करु इच्छितो की, उक्त विषयासंदर्भात मुख्यमंत्री महोदयांनी माननीय उप मुख्यमंत्री, माननीय ऊर्जा मंत्री, माननीय विरोधी पक्षनेते व माननीय गट नेते यांच्यासमवेत बैठक घेऊन शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने योग्य तो मार्ग काढावा. आता सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे, अशी मी विनंती करतो. सध्या लक्षवेधी सूचना क्रमांक-३ वर चर्चा सुरु आहे.

श्री.प्रताप सरनाईक : अध्यक्ष महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक-३ ला उत्तर देणारे मंत्री महोदय सध्या सभागृहामध्ये उपस्थित नाहीत, त्यामुळे लक्षवेधी सूचना क्रमांक -३ स्थगित ठेवून आता पुढील लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** वीज हा सर्व सन्माननीय सदस्यांच्या मतदारसंघातील अतिशय महत्त्वाचा विषय आहे. आता मुख्यमंत्री महोदयांसह उप मुख्यमंत्री देखील सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. उक्त विषयासंदर्भात मुख्यमंत्री महोदयांनी माननीय उप मुख्यमंत्री, माननीय ऊर्जा मंत्री, माननीय विरोधी पक्षनेते व माननीय गट नेते यांच्यासमवेत बैठक घेऊन शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने योग्य तो मार्ग काढावा, अशी मी सूचना केलेली आहे. त्यामुळे आता आपण सर्वांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, आपण दिलेल्या सूचनेचा आम्ही सन्मान करतो. परंतु आज सन्माननीय सदस्यांच्या भावना खूप तीव्र आहेत. आपण

श्री.देवेंद्र फडणवीस.......

यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत आहात, त्यामुळे मी आपले आभार मानतो. आमची विनंती अशी आहे की, जोपर्यंत माननीय उप मुख्यमंत्री सभागृहामध्ये येत नाहीत, तोपर्यंत या सभागृहाचे कामकाज स्थगित करावे. राज्यातील सर्व शेतकऱ्यांच्या नजरा या अधिवेशनाकडे लागलेल्या आहेत. उप मुख्यमंत्री महोदय, विधानपरिषद सभागृहामध्ये असतील तर ते या सभागृहामध्ये येईपर्यंत या सभागृहाचे कामकाज स्थगित करावे, अशी मी विनंती करतो. वीज तोडणी थांबविण्याबाबत माननीय उप मुख्यमंत्री यांनी दोन वेळा शब्द देऊन देखील त्यांनी तो पाळला नाही. त्यामुळे आता आमचा त्यांच्यावर विश्वास राहिलेला नाही. या विषयाचे गांभीर्य आपल्या लक्षात आले आहे, म्हणून आपण आमच्या बाजूने आहात, हे आमच्या लक्षात येत आहे. जोपर्यंत उप मुख्यमंत्री या सभागृहामध्ये येत नाहीत, तोपर्यंत या सभागृहाचे कामकाज स्थगित ठेवावे, अशी मी विनंती करतो.

**तालिका सभाध्यक्ष :** माननीय उप मुख्यमंत्री विधानपरिषद सभागृहामध्ये लक्षवेधी सूचनेला उत्तर देत आहेत. ते या सभागृहामध्ये आल्यानंतर आपल्या प्रश्नाला उत्तर देतील. आता आपण पुढील कामकाजास सुरुवात करु.

श्री.देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, सद्य:स्थितीत वीज तोडणी हा राज्यातील सर्वात महत्त्वाचा विषय आहे. शेतकऱ्यासमोर देखील यापेक्षा मोठा विषय नाही आणि राज्यासमोर शेतकऱ्यापेक्षा अन्य कोणताही विषय महत्त्वाचा नाही. त्यामुळे जोपर्यंत उप मुख्यमंत्री या सभागृहामध्ये येत नाहीत, तोपर्यंत या सभागृहाचे कामकाज स्थगित करावे. तसे पाहिले तर आता या सभागृहामध्ये जास्त कोणतेही सदस्य नाहीत. हे सभागृह रिकामे दिसत आहे. त्यामुळे या सभागृहाचे कामकाज स्थगित करुन माननीय उप मुख्यमंत्री यांना बोलाविण्यात यावे. माननीय उप मुख्यमंत्री यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कार्यवाही करावी, अशी मी विनंती करतो.

**तालिका सभाध्यक्ष :** मी आपणास सांगू इच्छितो की, आता विधानपरिषद सभागृहामध्ये माननीय उप मुख्यमंत्री लक्षवेधी सूचनेला उत्तर देत आहेत. सदर लक्षवेधी सूचनेचे उत्तर दिल्यानंतर ते या सभागृहामध्ये येणार आहेत.

**तालिका सभाध्यक्ष.......**

त्यामुळे मी आपणास विनंती करतो की, माननीय उप मुख्यमंत्री या सभागृहामध्ये येईपर्यंत आपण पुढील कामकाज घेऊ.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

श्री.बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, माननीय उप मुख्यमंत्री विधानपरिषद सभागृहामध्ये लक्षवेधी सूचनेला उत्तर देत आहेत. ते येईपर्यंत आपण पुढील लक्षवेधी सूचना चर्चेला घेऊ. कारण पुढील लक्षवेधी सूचना देखील खूप महत्त्वाची आहे. तसेच पुढील लक्षवेधी सूचना देखील पुकारलेली आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी......

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा.)

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री श्री. हसन मुश्रीफ सभागृहामध्ये उपस्थित आहेत. त्यांच्या विधेयकाला आम्ही समर्थन देणार आहोत. आज त्यांना सभागृहामध्ये विधेयक मांडावयाचे आहे. त्यांनी आता ते विधेयक मांडावे. ते विधेयक मंजूर होईपर्यंत आम्ही सभागृहाचे कामकाज चालू देऊ. त्यानंतर जोपर्यंत माननीय उप मुख्यमंत्री हे सभागृहामध्ये उपस्थित राहणार नाहीत, तोपर्यंत आम्ही सभागृहाचे कामकाज चालू देणार नाही. आम्हाला या प्रश्नाचे उत्तर मिळाले पाहिजे. ओबीसी समाजासंदर्भातील महत्त्वाचा विषय आहे. त्यामुळे माननीय मंत्री श्री. हसन मुश्रीफ यांनी ते विधेयक मांडावे.

**तालिका सभाध्यक्ष :** मी माननीय विरोधी पक्षेनेत्यांना विनंती करतो की, लक्षवेधी सूचना क्रमांक ४ चर्चेला घेऊ द्यावी. त्यानंतर पुढील कामकाज घेण्यात येईल.

श्री. बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, ही लक्षवेधी सूचना पुकारण्यात आलेली आहे. ती लक्षवेधी सूचना चर्चेला घ्यावी.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा.)

**तालिका सभाध्यक्ष :** मी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना विनंती करतो की, एक लक्षवेधी सूचना चर्चेला घेऊ द्यावी. इतरही कामकाज झाले पाहिजे. विधेयकाला सुधारणा येणार आहेत. त्यामुळे त्यास थोडा वेळ लागेल. तोपर्यंत लक्षवेधी सूचना चर्चेला घेता येईल.

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, आता विधेयक मांडावे. त्यास आमचे समर्थन आहे. सुधारणेसह विधेयक मांडावे.

**पृ.शी. :** मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र नगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक.

**L. A. BILL NO.V OF 2022**

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

श्री. एकनाथ शिंदे (नगर विकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक – ५ मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** अनुमती देण्यात आली आहे.

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक – ५ मांडतो.

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक – ५ मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

असुधारित प्रत

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

**खंड २ – सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १९ ची सुधारणा**

**तालिका सभाध्यक्ष :** खंड २ ला सन्माननीय सदस्य सर्वश्री सुनिल प्रभू, प्रकाश आबिटकर व प्रकाश सुर्वे यांनी सुधारणा सुचविलेली आहे. त्यांच्यापैकी एकाने ती मांडावी.

श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा मांडतो.

"पृष्ठ क्रमांक २, --
ओळ क्रमांक १० मध्ये

"राज्य शासन" या मजकुराऐवजी "राज्य शासन, राज्य निवडणूक आयुक्ताच्या मान्यतेने" हा मजकूर दाखल करण्यात येईल.".

सुधारणा प्रस्तुत झाली.

**तालिका सभाध्यक्ष :** आता मी सन्माननीय सदस्यांनी मांडलेली सुधारणा मतास टाकतो.

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

खंड २, 'सुधारणा केल्याप्रमाणे' विधेयकाचा भाग झाला.

**खंड ३ – सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ ची सुधारणा.**

**तालिका सभाध्यक्ष :** खंड ३ ला सन्माननीय सदस्य सर्वश्री सुनिल प्रभू, प्रकाश आबिटकर व प्रकाश सुर्वे यांनी सुधारणा सुचविलेली आहे. त्यांच्यापैकी एकाने ती मांडावी.

श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा मांडतो.

"पृष्ठ क्रमांक २, --
ओळ क्रमांक १५ मध्ये

"राज्य शासन" या मजकुराऐवजी "राज्य शासन, राज्य निवडणूक आयुक्ताच्या मान्यतेने" हा मजकूर दाखल करण्यात येईल.".

सुधारणा प्रस्तुत झाली.

**तालिका सभाध्यक्ष :** आता मी सन्माननीय सदस्यांनी मांडलेली सुधारणा मतास टाकतो.

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

खंड ३, 'सुधारणा केल्याप्रमाणे' विधेयकाचा भाग झाला.

**खंड ४ – सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम १० ची सुधारणा.**

**तालिका सभाध्यक्ष :** खंड ४ ला सन्माननीय सदस्य सर्वश्री सुनिल प्रभू, प्रकाश आबिटकर व प्रकाश सुर्वे यांनी सुधारणा सुचविलेली आहे. त्यांच्यापैकी एकाने ती मांडावी.

श्री. सुनिल प्रभू (दिंडोशी) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा मांडतो.

"पृष्ठ क्रमांक २, --
(१) ओळ क्रमांक २३ मध्ये
"राज्य शासन" या मजकुराऐवजी "राज्य शासन, राज्य निवडणूक आयुक्ताच्या मान्यतेने" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) ओळ क्रमांक २६ मधील,
"राज्य शासन" या मजकुराऐवजी "राज्य शासन, राज्य निवडणूक आयुक्ताच्या मान्यतेने" हा मजकूर दाखल करण्यात येईल.".

सुधारणा प्रस्तुत झाली.

**तालिका सभाध्यक्ष :** आता मी सन्माननीय सदस्यांनी मांडलेली सुधारणा मतास टाकतो.

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

खंड ४, 'सुधारणा केल्याप्रमाणे' विधेयकाचा भाग झाला.

यानंतर श्री. चौधरी...

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष :** खंड ५ ला कोणतीही सुधारणा नसल्यामुळे तो मी मतास टाकतो.

खंड ५, विधेयकाचा भाग झाला.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक-५ 'सुधारणा केल्याप्रमाणे' संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न एकमताने संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक-५ 'सुधारणा केल्याप्रमाणे' एकमताने संमत झाले आहे.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी. :** ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. VI OF 2022.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT AND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961)

श्री.हसन मुश्रीफ (ग्रामविकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ६-महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** अनुमती देण्यात आली आहे.

श्री.हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक-६ मांडतो.

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ६-महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

**खंड २- सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १० ची सुधारणा**

**तालिका सभाध्यक्ष :** खंड २ ला सन्माननीय सदस्य सर्वश्री. अनिल भाईदास पाटील व दिलीपराव बनकर यांनी सुधारणा सुचविलेली आहे. त्यांच्यापैकी एकाने ती मांडावी.

श्री. अनिल पाटील (अमळनेर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा मांडतो.

"पृष्ठ क्रमांक २, --
ओळ क्रमांक ८ मध्ये
"राज्य निवडणूक आयोग या मजकुराऐवजी राज्य शासन" या मजकुराऐवजी "राज्य निवडणूक आयोग" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या मजकुराऐवजी "राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने, राज्य शासन" हा मजकूर दाखल करण्यात यावा.".

सुधारणा प्रस्तुत झाली.

**तालिका सभाध्यक्ष :** आता मी सन्माननीय सदस्यांनी मांडलेली सुधारणा मतास टाकतो.

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

खंड २, 'सुधारणा केल्याप्रमाणे' विधेयकाचा भाग झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** खंड ३ ला कोणतीही सुधारणा नसल्यामुळे तो मी मतास टाकतो.

खंड ३, विधेयकाचा भाग झाला.

**खंड ४- सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १२ ची सुधारणा**

**तालिका सभाध्यक्ष :** खंड ४ ला सन्माननीय सदस्य सर्वश्री. अनिल भाईदास पाटील व दिलीपराव बनकर यांनी सुधारणा सुचविलेली आहे. त्यांच्यापैकी एकाने ती मांडावी.

श्री. अनिल पाटील (अमळनेर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा मांडतो.

"पृष्ठ क्रमांक २, --
ओळ क्रमांक १६ मध्ये
"राज्य शासन" या मजकुराऐवजी "राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने, राज्य शासन" हा मजकूर दाखल करण्यात यावा.".

सुधारणा प्रस्तुत झाली.

**तालिका सभाध्यक्ष :** आता मी सन्माननीय सदस्यांनी मांडलेली सुधारणा मतास टाकतो.

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

खंड ४, 'सुधारणा केल्याप्रमाणे' विधेयकाचा भाग झाला.

**खंड ५- सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ५८ ची सुधारणा**

**तालिका सभाध्यक्ष :** खंड ५ ला सन्माननीय सदस्य सर्वश्री. अनिल भाईदास पाटील व दिलीपराव बनकर यांनी सुधारणा सुचविलेली आहे. त्यांच्यापैकी एकाने ती मांडावी.

श्री. अनिल पाटील (अमळनेर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा मांडतो. तसेच दुरुस्तीला मान्यता देण्यापूर्वी निवडणूक आयोगाने राज्य शासनाशी चर्चा करुन निवडणुकीचा कार्यक्रम करावा, अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत

"पृष्ठ क्रमांक २, --
ओळ क्रमांक १९ मध्ये
"राज्य शासनाकडून" या मजकुराऐवजी "राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने, राज्य शासनाकडून" हा मजकूर दाखल करण्यात यावा.".

सुधारणा प्रस्तुत झाली.

**तालिका सभाध्यक्ष :** आता मी सन्माननीय सदस्यांनी मांडलेली सुधारणा मतास टाकतो.

सुधारणा मतास टाकून संमत झाली.

खंड ५, 'सुधारणा केल्याप्रमाणे' विधेयकाचा भाग झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** खंड ६ ला कोणतीही सुधारणा नसल्यामुळे तो मी मतास टाकतो.

खंड ६, विधेयकाचा भाग झाला.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक - ६ 'सुधारणा केल्याप्रमाणे' संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न एकमताने संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष :** सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक - ६ 'सुधारणा केल्याप्रमाणे' एकमताने संमत झाले आहे.

---------

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

असुधारित प्रत

श्री. देवेंद्र फडणवीस : अध्यक्ष महोदय, जोपर्यंत उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार सभागृहात येत नाहीत तोपर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित करावे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

**पृ. शी :** अनन्य विशेष न्यायालये (शक्ती कायद्याखालील महिलांच्या व बालकांच्या विरुध्दच्या विवक्षित अपराधांसाठी) विधेयक

**मु. शी. :** सन २०२० चे वि.स.वि. क्रमांक ५२ - अनन्य विशेष न्यायालये (शक्ती कायद्याखालील महिलांच्या व बालकांच्या विरुध्दच्या विवक्षित अपराधांसाठी) विधेयक यावरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.

श्री. दिलीप वळसे-पाटील (गृह मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२० चे वि.स.वि. क्रमांक ५२ - अनन्य विशेष न्यायालये (शक्ती कायद्याखालील महिलांच्या व बालकांच्या विरुध्दच्या विवक्षित अपराधांसाठी) विधेयक यावरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

**तालिका सभाध्यक्ष** : सन २०२० चे वि.स.वि. क्रमांक ५२ यावरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

--------

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक २.३० वाजेपर्यंत स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी २.०४ ते २.३० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत

**(स्थगितीनंतर)**

**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)**

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात. )

**लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याबाबत**

**उपाध्यक्ष** : आजच्या कामकाज पत्रिकेत दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहेत.

------

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात. )

**पृ.शी.** : मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक

**L. A. BILL NO. III OF 2022**

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE MAHARASHTRA EDUCATION AND EMPLOYMENT GUARANTEE (CESS) ACT, 1962 AND THE MAHARASHTRA (URBAN AREAS) PROTECTION AND PRESERVATION OF TREES ACT, 1975.)

श्री. एकनाथ शिंदे (नगर विकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्र. ३ मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) अधिनियम, १९६२ आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यांत आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपाध्यक्ष** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्र. ३ मांडतो.

**उपाध्यक्ष** : विधेयक मांडण्यात आले आहे.

--------

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात. )

**पृ.शी.**: मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक

**L. A. BILL NO.IV OF 2022**

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT.)

श्री. एकनाथ शिंदे (नगर विकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्र. ४ मुंबई महानगरपालिका अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपाध्यक्ष** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. एकनाथ शिंदे : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२२ चे वि.स.वि. क्र. ४ मांडतो.

**उपाध्यक्ष** : विधेयक मांडण्यात आले आहे.

--------

असुधारित प्रत

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात. )

**पृ.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

**मु.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा.

(प्रस्ताव पुन: प्रस्तुत झाला.)

**उपाध्यक्ष** : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चेचा आज दुसरा व शेवटचा दिवस आहे. आजच्या दिवसाचे कामकाज लक्षात घेता चर्चेसाठी माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तरासह सर्वसाधारणपणे एकूण २.३० तास उपलब्ध आहेत. पक्षाच्या प्रतोदांमार्फत माझ्याकडे नावे प्राप्त झालेली आहेत. आता चर्चेस सुरुवात करण्यात येत आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देत असतात. )

आता मी पुढील प्रस्ताव मतास टाकतो.

"माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही, या अधिवेशनाकरिता जमलेले महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

------

यानंतर श्रीमती करंदीकर....

असुधारित प्रत

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितपणे घोषणा देत असतात )

**पृ. शी. :** अनुदानाकरिता पुरवणी मागण्या

**मु. शी. :** सन २०२१-२०२२ च्या अनुदानाकरिता पुरवणी मागण्या :

१) महसूल व वन विभाग

२) नगर विकास विभाग

३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

**उपाध्यक्ष :** आता १) महसूल व वन विभाग २) नगर विकास विभाग ३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग या विभागांच्या पुरवणी मागण्या चर्चेला घेण्यात येतील. या मागण्यांचा तपशील कार्यक्रम पत्रिकेबरोबर वितरित केला आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले मागण्यासंबंधीचे जोडपत्र छापावे )

असुधारित प्रत

असुधारित प्रत

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये एकत्रितपणे घोषणा देत असतात )

**उपाध्यक्ष :** विभागांच्या मागण्यांचा तपशील व स्वीकृत कपात सूचनांची यादी सदस्यांना टपालखणाद्वारे वितरित करण्यात आली आहे. कपात सूचना न मांडता मान्य करण्यात आलेल्या कपात सूचनांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने तीस दिवसांच्या कालावधीत सदस्यांना पाठविण्याची प्रथा माहे जुलै,२०१० पासून मान्य झाली असल्यामुळे आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही, असे मी गृहीत धरतो.

या चर्चेसाठी एकूण तीन तास वेळ देण्यात येईल. या तीन तासांपैकी सत्तारुढ पक्षास संबंधित मंत्र्यांच्या उत्तरासह निम्मा वेळ आणि विरोधी पक्षास निम्मा वेळ देण्यात येईल. सदस्य वेळेचे बंधन पाळून मला सहकार्य करतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. प्रत्येक सदस्याने भाषण सुरु करण्याच्या वेळी विभाग, त्याचबरोबर बाब क्रमांक व पूरक विवरणपत्रातील पृष्ठ क्रमांक यांचा उल्लेख करावा. पुरवणी मागण्यांवरील चर्चा संबंधित बाबींपुरतीच मर्यादित असल्यामुळे सदस्यांना मूळ

अनुदान अथवा मूळ मागणी यावर चर्चा करता येणार नाही. आता माननीय विरोधी पक्ष नेते चर्चेला सुरुवात करतील. त्या नंतर इतर सदस्यांची भाषणे होतील या नंतर माननीय मंत्री श्री सुभाष देसाई, सन्माननीय मंत्री श्रीमती आदिती तटकरे, सन्माननीय मंत्री डॉ. नितीन राऊत, सन्माननीय मंत्री सर्वश्री एकनाथ शिंदे, विजय वडेट्टीवार,प्राजक्त तनपुरे यांचे उत्तराचे भाषण होईल.

असुधारित प्रत

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये एकत्रितपणे घोषणा देत असतात )

श्री. अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, १) महसूल व वन विभाग २) नगर विकास विभाग, तसेच ३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग या सर्व विभागांच्या मागण्या वितरित केलेल्या सूचीप्रमाणे मंजूर कराव्यात, अशी मी विनंती करतो.

**उपाध्यक्ष** : आता मी १) महसूल व वन विभाग २) नगर विकास विभाग ३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग या विभागांच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक सी-५, सी-६, एफ-२, एफ-५, के-६, के-७, के-११ आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

--------

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये एकत्रितपणे घोषणा देत असतात )

**उपाध्यक्ष :** सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक ८ मार्च, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ३८ मिनिटांनी, मंगळवार, दिनांक ८ मार्च, २०२२ च्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत